इयत्ता पहिली ते पाचवीतील १००% विद्यार्थ्यांचा
मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रम : २०१७-१८

# शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिका

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११ ०३०.

## इयत्ता पहिली ते पाचवीतील १००% विद्यार्थ्यांचा मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रम : २०१७–१८
## शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिका


**प्रवर्तक :** **मा. ना. विनोद तावडे**
मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ, महाराष्ट्र राज्य.

**प्रेरणा व मार्गदर्शन :** **मा. श्री. नंदकुमार (भा.प्र.से.)**
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र शासन तथा राज्य प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

**मा. डॉ. विपिन शर्मा (भा.प्र.से.)**
आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र शासन.

**संपादक व प्रकाशक :** **डॉ. सुनिल मगर**
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे.

**कार्यकारी संपादक :** **सुजाता लोहकरे**
विभाग प्रमुख (भाषा), महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.

**लेखन व संपादन :** **नामदेव माळी,** अधिव्याख्याता, जि. शै. सा. व्या. वि. संस्था, सांगली.
**प्रतिभा भराडे,** वि. अ. (शि.), बीट, कुमठे, ता. जि. सातारा.

**संपादन सहाय्य :** **सचिन लोखंडे** , प्र. अधिव्याख्याता, मराठी, महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.
**संपत गावडे** , विषय सहायक, मराठी, महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.
**हनुमंत जाधव** , विषय सहायक, मराठी, महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.
**ललीता भामरे**, विषय सहायक, जि. सा. शै. वि. संस्था नंदुरबार.
**संदीप वाक्चौरे**, विषय सहायक, जि. सा. शै. वि. संस्था अहमदनगर.
**समाधान शिकेतोड**, विषय सहायक, जि. सा. शै. वि. संस्था उस्मानाबाद.
**तौसिफ परवेज**, विषय सहायक, उर्दू विभाग, महा. रा. शै. सं. व प्र. प. (विद्या प्राधिकरण), पुणे.
**आशा सकट**, उपशिक्षक, जि. प. शाळा, तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे.
**सीमा महाडीक**, उपशिक्षक, जि. प. शाळा, चिरमोडी, ता. वेल्हे, जि. पुणे.

**अर्थसहाय्य :** महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

**पुनर्मुद्रण :** ऑक्टोबर २०१८

**प्रती :** ५००

**मुद्रक :** रुना ग्राफिक्स, सिंहगड रोड, पुणे ४१.

**विनोद तावडे**
**मंत्री**
**शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,**
**उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,**
**अल्पसंख्याक विकास व वक्फ**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :
27 NOV 2017

## शुभेच्छा

दि. २२ जून २०१५ पासून राज्यात 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रम शालेय शिक्षण विभागामार्फत सुरू करण्यात आला आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांनी शिक्षण विभागास दिलेल्या केआरए (KRA) नुसार महाराष्ट्रास गुणवत्तेत देशात पहिल्या तीन क्रमांकात येण्यासाठी आपण नियोजनबद्ध काम सुरू केले आहे. ९ जानेवारी, २०१७ पासून राज्यात जलद प्रगत शैक्षणिक कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. त्याचा परिणाम म्हणून राज्यात जवळपास ५३,००० शाळा प्रगत झाल्या आहेत.

राज्यातील १०० टक्के मुले प्रगत होण्यासाठी त्यांचा शिकण्याचा पाया भक्कम हवा. औपचारिक भाषा शिक्षणात याची सुरुवात मूलभूत वाचनाने होत असते. ही वाचन शिकण्याची प्रक्रिया परिणामकारक व आनंदाने व्हायला हवी. यासाठी राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळांमधील इयत्ता १ली ते ५वीच्या सर्व शिक्षकांसाठीचे प्रशिक्षणही आनंददायी व परिणामकारक व्हावे या उद्देशाने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. या प्रशिक्षणासाठी तयार करण्यात आलेली ही मार्गदर्शिका शिक्षकांना वर्गातील प्रत्येक मूल वाचते आणि शिकते करण्याचा मार्ग दाखवेल.

मला खात्री आहे की, ही मार्गदर्शिका आणि अध्ययन समृद्धी साहित्य संच यांचा आपण सर्वजण नियमितपणे उपयोग कराल आणि आगामी शैक्षणिक सर्वेक्षण अहवालात राज्य शैक्षणिक गुणवत्तेत प्रगतिपथावर आणाल. त्यासाठी आपणांस सर्वांना शुभेच्छा...!

विनोद तावडे

facebook.com/tawdevinod twitter.com@TawdeVinod vinodtawdeminister@gmail.com

**संवाद शिक्षक मित्रांशी...**

# समता ते वाचन क्षमता

- **आम्ही सर्व 'माणसे' आहोत :**

आम्ही सर्व माणसे आहोत आणि सर्व माणसे समान असतात हे सर्वमान्य सत्य आहे. जगातील प्रत्येक माणसाला आनंद हवाच असतो. आनंदाबरोबरच प्रत्येक माणसाला आत्मसन्मान, समाधान, प्रेम, विश्वास हे हवेच असते हे ही सत्य आहे.

माणसाला आत्मसन्मान, आनंद इ. किती हवा असतो असे विचारल्यास 'जेवढे मिळाले तेवढे कमीच' असे त्याचे उत्तर असते. तसेच या पाचही बाबींचे मोजमाप करता येत नाही. त्यामुळे माणसांच्या या गरजा सर्व माणसांमध्ये समान आहेत असे म्हणता येईल. याचाच अर्थ या गरजांच्या बाबतीत सर्व माणसे समान आहेत. यालाच राज्यघटनेत समानता असे संबोधण्यात आले आहे.

प्रत्येक माणसाला अन्न, वस्त्र, निवारा, झोप, पाणी हे सुद्धा हवे असते. परंतु या गरजा 'मिळाल्या तेवढ्या कमीच' असे नसते. या गरजा मोजता येतात आणि त्याचे प्रमाण आणि प्रकार प्रत्येक माणसासाठी वेगवेगळे असू शकते. त्यामुळे या गरजांच्या पातळीवर सर्व माणसे समान नसतात.

- **आम्ही उपयोगी माणसे आहोत :**

प्रत्येक माणसाची क्षमता सारखीच (समान) असते. माणसे योग्यतेच्या पातळीवर वेगळी दिसतात. माणूस स्वतःची योग्यता विकसित करतो. माणूस ज्या बाबींकडे लक्ष देतो त्या बाबींमध्ये त्याची योग्यता वाढते. माणसाची योग्यता ही लक्ष देण्यावर अवलंबून असते आणि योग्यतेप्रमाणे पात्रता निश्चित होते. पात्रतेप्रमाणे त्यांना पद/फळे मिळतात. व्यक्तीस जेवढे फळ मिळेल तेवढीच त्याची यशस्विता. यश हे प्रत्येक माणसाला हवे असते. आयुष्यात मिळणाऱ्या यशाच्या एकत्रीकरणातून माणूस स्वतःची उपयोगिता सिद्ध करण्यासाठी प्रयत्नशील असतो. उपयोगिता सिद्ध झाली की माणूस आंनदी होतो. प्रत्येक माणसाला हा निरंतर आनंद हवाच असतो. या पातळीवर माणसे समान असतात.

- **उपयोगिता सिद्ध झाल्याने आनंद मिळतो :**

पाण्याचे मूल्य (किंमत नव्हे) तहान भागवणे हे आहे, अन्नाचे मूल्य भूक भागवणे हे आहे तसे माणसाचे मूल्य स्वतःची उपयोगिता सिद्ध करणे आहे. स्वतःची मूल्यप्राप्ती करण्याच्या आनंदापेक्षा मोठा आनंद माणसाच्या जीवनात शक्य नाही. स्वतःचे मूल्य प्राप्त करणे हे माणसाचे लक्ष्य (उद्दिष्ट) आहे. त्यासाठी तो आयुष्यभर झटत राहतो. मात्र या बाबींकडे आजच्या माणसाचे लक्ष तेवढे स्पष्टपणे गेलेले नाही.

शिक्षणाने प्रत्येक माणसामध्ये ही स्पष्टता येणे आवश्यक आहे. शिक्षणातून हे उद्दिष्ट पूर्ण झाल्यास प्रत्येक माणूस आजच्यापेक्षा अधिक समाधानी आणि आनंदी होईल. समाधान आणि आनंद प्रत्येक माणसाला हवाच

असतो. ज्या दिशेने लक्ष दिल्याने अधिकाधिक आनंद मिळेल त्या दिशेकडे माणसाचे लक्ष जाईल. उपयोगिता मूल्य सिद्ध करण्याने परम आनंद मिळतो हे कळल्यावर त्याकडे सर्व माणसे लक्ष देतील.

- **माझा आनंद माझ्या वर्गातील प्रत्येक मूल शिकण्यात :**

वर्गातील प्रत्येक मूल शिकले तर शिक्षक यशस्वी झाला. त्याचे शिक्षक उपयोगिता मूल्य सिद्ध झाले. जोपर्यंत वर्गातील १००% मुले शिकत नाहीत शिक्षकाचे उपयोगिता मूल्य सिद्ध होत नाही तोपर्यंत शिक्षक समाधानी किंवा आनंदी होत नाही. प्रत्येकाला समाधान किंवा आनंद हवाच असतो. हवा असताना सुद्धा त्याला तो मिळत नाही तो तोट्यात राहतो. सेवानिवृत्तीपर्यंत केव्हाही वर्गातील १००% मुले शिकली नाहीत तर शिक्षक म्हणून त्याचे उपयोगिता मूल्य सिद्ध झाले नाही. आयुष्य संपून गेले पण उपयोगिता सिद्ध झाली नाही म्हणून आयुष्यात खरा आनंद मिळाला नाही असे आपल्या बाबतीत होत नाहीना याचा विचार करायला हवा. सेवानिवृत्ती अगोदर १००% मुलांना शिकविता आल्यास अजूनही आपण आपली उपयोगिता सिद्ध करून आपला हक्काचा आनंद प्राप्त करू शकतो.

- **माझ्या आनंदासाठी :**

आपण सर्वजण माणसे आहोत त्याचप्रमाणे शिक्षकही आहोत. आपला आनंद आपली मुले शिकण्यात आहे. असा एकही शिक्षक आपल्यामध्ये नाही ज्याला आपली मुले नाही शिकली तर आनंद होतो म्हणून माझ्या स्वतःच्या आनंदासाठी माझ्या वर्गातील सर्व मुले शिकावीत यासाठी आपण प्रयत्न करीत असता.

- **प्रत्येक मूल शिकू शकते, प्रत्येक शिक्षक शिकवू शकतो :**

प्रत्येक मुलामध्ये शिकण्याची क्षमता असते तशी प्रत्येक शिक्षकामध्ये शिकवण्याची क्षमता असते. आपण सगळेजण आपल्या वर्गातील सर्व मुलांना मनापासून शिकवितो. पण काही मुले शिकत नाहीत.

प्रत्येक मूल माणूस आहे. माणसाप्रमाणे त्याच्याही आनंद, आत्मविश्वास, प्रेम, समाधान आणि यश या प्रत्येक मुलाच्या गरजा आहेत. यातील एक जरी गरज पूर्ण नाही झाली तरी मूल शाळेत रमत नाही, शिकत नाही म्हणून टिकत नाही. हेच आपल्या दुःखाचे कारण होते.

मुलाला शिकण्यातून आनंद, आत्मविश्वास आणि यश मिळत नाही याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शिकण्याचे, स्वतः पलीकडचे जग समजून घेण्यासाठी आवश्यक असलेले 'वाचन' त्याला येत नाही. त्याला वाचता आले तर ते शिकते होईल. वाचन शिकण्याची ही प्रक्रिया मुलासाठी आनंद, आत्मविश्वास, प्रेम, समाधान आणि यश देणारी असेल तर प्रत्येक मूल वाचायला शिकेल आणि आपणही आनंदी होऊ!

**नंदकुमार (भा.प्र.से.)**
प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

# मनोगत

प्रिय शिक्षक मित्रांनो,

राज्यातील प्रत्येक मूल शिकून प्रगत झाले पाहिजे हे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचे ध्येय आहे. ते साध्य करण्यासाठी राज्यातील शिक्षकांना आवश्यक ती मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे ही विद्या प्राधिकरणाची जबाबदारी आहे. वाचन करता येणे ही प्रत्येक मुलाची शिकण्याची प्रक्रिया सहज सुलभ होण्यासाठीची प्राथमिक अट असते. राज्यातील प्रत्येक मुलाची मूलभूत वाचन क्षमता विकसित झाली तर प्रगत शैक्षणिक कार्यक्रमाच्या ध्येयापर्यंत आपण सहज पोहोचू शकू.

'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमातील अनेकविध उपक्रमांमुळे आपल्या राज्यातील ५३,००० शाळा प्रगत झालेल्या आहेत. मात्र १००% मुलांची वाचन क्षमता विकसित करण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. आपल्या वर्गातील प्रत्येक मूल प्रगत असावे असे प्रत्येक शिक्षकाला वाटत असते आणि त्यासाठी तो प्रयत्नही करीत असतो. मात्र तरीही वर्गातील काही मुलांना वाचता येत नाही म्हणून राज्यातील ज्या शाळांमधील १००% मुले शिकत आहेत त्या शाळांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वाचन विकास टप्प्यांवर आधारित असलेला प्रशिक्षण कार्यक्रम मराठी विभागामार्फत तयार करण्यात आला आहे. या कार्यक्रमातील वाचन विकास टप्पे आणि त्यामागील विचार समजून घेऊन प्रत्येक शाळेस पुरविण्यात आलेल्या अध्ययनसमृद्धी साहित्य संचाच्या सहाय्याने कृती कार्यक्रम घेतल्यास ३ महिन्यांच्या कालावधीत इयत्ता पहिली ते पाचवीमधील १००% मुलांची मूलभूत वाचन क्षमता विकसित होणार आहे.

या राजव्यापी प्रशिक्षण कार्यक्रमातील सुलभक व शिक्षकांसाठी ही मार्गदर्शिका तयार करण्यात आली आहे. मूलभूत वाचन क्षमता विकासासाठी शिक्षण पूरक कृती व श्रवण–भाषण–संभाषण–वाचन विकासासाठीच्या कृती वर्गात का व कशा घ्यायच्या हे या पुस्तिकेतून समजणार आहे. याशिवाय प्रत्येक मूल शिकते करण्यासाठी आवश्यक असलेला समतेचा, मुलांच्या भाषेकडे संसाधन म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन आपल्यामध्ये विकसित होण्यास मदत व्हावी या हेतूने समता व भिन्नभाषिक मुलांचे भाषा शिक्षण या घटकांचा समावेशही करण्यात आला आहे.

परिणामासाठी प्रशिक्षण या शासन निर्णयानुसार या प्रशिक्षणात शिक्षकांचे मूल्यांकनही केले जाणार आहे. यामध्ये ४०% भारांश प्रशिक्षण प्रक्रियेतील सहभागासाठी व ६०% भारांश प्रत्यक्ष वर्गात प्रशिक्षणाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी असेल.

हे प्रशिक्षणाचे स्वरूप शिक्षकांसाठी कृतियुक्त, आनंददायी व विचारप्रवण करणारे आहे. त्यामुळे शिक्षक अत्यंत उत्साहाने व आनंदाने या प्रशिक्षणात सहभागी होतात असा प्रायोगिक प्रशिक्षणाच्या वेळचा अनुभव आहे. आता सर्व शिक्षक हसत–खेळत आणि कृती करत करत नवे शिकण्याचा अनुभव आनंदाने घेतील आणि जबाबदारीने आपल्या वर्गातील प्रत्येक मूल वाचते करतील असा विश्वास वाटतो.

या आनंददायी वाटचालीसाठी आपणा सर्वांना शुभेच्छा...!

**डॉ. सुनिल मगर**
संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे.

# इयत्ता पहिली ते पाचवीतील १००% विद्यार्थ्यांचा
# मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रम : २०१७-१८
# शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शिका

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रशिक्षणाची गरज, उद्दिष्टे, कार्यपद्धती व परिणामकारकता | ४ |
| २. | समता : का व कशी? | ७ |
| ३. | बहुभाषिक विद्यार्थ्यांचे भाषा शिक्षण | ९ |
| ४. | प्रशिक्षणाचे वेळापत्रक – (मराठी परिसर भाषा असणाऱ्यांसाठी ) | १३ |
| ५. | प्रशिक्षण सत्र कार्यपद्धती | १४ |
| | दिवस पहिला : सत्र क्र. १ : प्रशिक्षणाची गरज, उद्दिष्टे, स्वरूप व परिणामकारकता | १४ |
| | दिवस पहिला : सत्र क्र. २ : समता ते वाचन क्षमता | १५ |
| | दिवस पहिला : सत्र क्र. ३ : बहुभाषिक/मराठीपेक्षा भिन्न मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे भाषा शिक्षण | १७ |
| | दिवस पहिला : सत्र क्र. ४ : शिक्षणपूरक कृती – १ | १८ |
| | दिवस पहिला : सत्र क्र. ५ : शिक्षणपूरक कृती – २ | २० |
| | दिवस दुसरा : सत्र क्र. १ : श्रवण – १ | २१ |
| | दिवस दुसरा : सत्र क्र. २ : श्रवण – २ | २२ |
| | दिवस दुसरा : सत्र क्र. ३ : भाषण संभाषण – १ | २३ |
| | दिवस दुसरा : सत्र क्र. ४ : भाषण संभाषण – २ | २५ |
| | दिवस दुसरा : सत्र क्र. ५ : वाचन – १ | २७ |
| | दिवस तिसरा : सत्र क्र. १ : वाचन – २ | २९ |
| | दिवस तिसरा : सत्र क्र. २ : वाचन – ३ | ३१ |
| | दिवस तिसरा : सत्र क्र. ३ : वाचन – ४ | ३३ |
| | दिवस तिसरा : सत्र क्र. ४ : कृती कार्यक्रम | ३४ |
| ६. | कृती कार्यक्रम आराखडा | ३५ |
| ७. | प्रशिक्षणाचे वेळापत्रक (बोली/बहुभाषिक क्षेत्रासाठी) व मार्गदर्शक सूचना | ३८ |

# वाचन, मूलभूत वाचन क्षमता व पायाभूत वाचन क्षमता

- **वाचणे म्हणजे :**

लिहिलेल्या किंवा छापलेल्या मजकुरातील अर्थ समजून घेणे. आपणा सर्वांना वाचता येते. पण आपण जे वाचतो त्या सगळ्याच मजकुराचा अर्थ आपल्याला पूर्णपणे (लेखकाला अभिप्रेत आहे तोच आणि तसाच) समजतो असे नाही. शाळेत असताना वाचलेल्या एखाद्या कवितेचा, वाक्याचा अर्थ मोठेपणी समजायला लागतो. म्हणजेच अर्थ समजून घेण्याची प्रक्रिया आयुष्यभर चालू असते. मजकुरातील अर्थ समजून घेण्याची ही प्रक्रिया बरीच गुंतागुंतीची असते. ती मनात एकाच वेळी दोन पातळ्यांवर चालते.

पहिली पातळी म्हणजे लिहिलेल्या मजकुराचे बोलण्याच्या भाषेत रूपांतर (मूकपणे किंवा प्रकटपणे) करणे. (Decoding) त्यासाठी **अक्षरे आणि बाराखडीची चिन्हे ओळखता येणे.** अक्षरे म्हणजे आपल्या तोंडातून निघणाऱ्या ध्वनींसाठी भाषा व्यवस्थेत निश्चित केलेल्या खुणा. त्या ओळखणे व उच्चारता येणे म्हणजे लिपी परिचय होणे.

लिपी परिचय वाचता येण्यासाठी आवश्यक आहे मात्र केवळ लिपी परिचय झाला म्हणजे वाचता आले असे नाही. (अपरिचित भाषेतील देवनागरीत लिहिलेला मजकूर आपणास उच्चारता येईल, वाचता येणार नाही.) म्हणजेच चिन्हे ओळखणे आणि त्याचा अर्थ लावण्याची प्रक्रिया मनात एकाच वेळी दोन पातळ्यांवर चालू असते.

ज्या शब्दाचा अर्थ मुलांना ऐकून समजतो आणि जे बोलताना वापरले जातात त्या शब्दांच्या साहाय्याने विसांकेतीकरण (decoding) केले तर मुले जलद गतीने वाचायला शिकतात हा संशोधनांमधून सिद्ध झालेला आणि सार्वत्रिक अनुभव आहे.

परिचित शब्दांच्या मदतीने लिपी परिचय सुरू झाला की परिचित अक्षरांनी बनलेले अपरिचित शब्द मूल ओळखायला लागेल. लिहिलेल्या शब्दांना काहीतरी अर्थ असतो हे त्याला माहीत आहे. हे माणसाचे मूल आहे. ते पूर्वज्ञानाच्या आधारे आजूबाजूच्या माणसांच्या, साहित्याच्या मदतीने नवे समजून घेत असते. ओळखता आलेल्या नव्या शब्दांचा अर्थ लावण्याची प्रक्रिया अशी सुरू झाली की शाळेत आणि आजूबाजूच्या जगात लिहिलेली माहिती समजून घेणे, त्यावर वर्गीकरण, विश्लेषण, प्रतिसाद, प्रतिक्रिया आणि उपयोजन इ. उच्च विचार प्रक्रिया घडून येण्याचा मार्ग मोकळा होतो.

**हे सारे घडण्यासाठी माहीत असलेल्या शब्दांच्या साहाय्याने विसांकेतीकरण करता येणे हे मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.**

- **कार्यात्मक व्याख्या :**
  - **मूलभूत वाचन क्षमता :** वाचता येण्यासाठी आवश्यक असलेल्या मूळ क्षमता. यामध्ये विशिष्ट लिपीबद्ध संकेत/खुणा (मुळाक्षरे /शब्द/वाक्ये) ओळखणे आणि संकेतानुसार त्याचे योग्य

रितीने उच्चारण करता येणे या क्षमतांचा समावेश होतो ज्यांच्या आधारे शिकण्यासाठी आवश्यक असलेली लिहिलेले समजून घेण्याची प्रक्रिया होते.

- **पायाभूत वाचन क्षमता :** आधीच्या इयत्तेतील वाचन क्षमता ज्याच्या आधारे पुढील इयत्तेतील वाचन क्षमता विकास होतो.

❍ **मूल अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करीत वाचन करीत आहे हे आपल्याला कसे कळेल?**

**१) एका दृष्टिक्षेपात शब्द ओळखणे व योग्य गतीने उच्चारता येणे.**

'कावळा' हा शब्द वाचताना मुलाने, ''क क कपाचा, कला काना काऽऽ, व व वजनाचा, ळ ळ बाळातला, ळ ला काना ळा'' असे वाचले तर हे सारे होईपर्यंत अर्थ निसटून जाण्याची अधिक शक्यता असते. म्हणून शब्द हा एक घटक (UNIT) म्हणून ओळखला व उच्चारला गेला तर अर्थ समजण्याचा प्रवास सुरू झाला असे म्हणता येते.

**२) वाक्याचे मजकुराचे उच्चारण योग्य गतीने करता येणे.**

वाक्य संपले. अर्थ पूर्ण झाला म्हणून पूर्णविरामाचे टिंब आले म्हणून मूल तिथे क्षणभर थांबले. असे झाले तर मूल वाक्यात अर्थ आहे हे समजून वाचू लागले आहे असे आपल्याला कळते. तसेच स्वल्पविरामापाशीही थोडेसे थांबले तर मुलाचा प्रवास अर्थपूर्ण वाचनाकडे होत आहे असे आपण म्हणू शकतो.

◈◈◈

---

- या पुस्तिकेत वेळापत्रकानुसार मूलभूत वाचन क्षमता विकासासाठी सत्रनिहाय प्रशिक्षण कार्यपद्धतीचा तपशील दिलेला आहे.
- पहिल्या तीन सत्रांसाठी पूरक तसेच कृती कार्यक्रमातील वाचन साहित्य म्हणून मार्गदर्शनपर लेखांचा समावेश केलेला आहे.
- सत्र कार्यपद्धतीत शिक्षणपूरक कृती श्रवण, भाषण संभाषण व वाचन या क्षेत्रांसाठी दिलेली उद्दिष्टे ही विद्यार्थ्यांसाठीची आहेत. ही सर्व उद्दिष्टे साध्य करण्याची क्षमता शिक्षकांमध्ये विकसित करणे हे प्रशिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.
- अध्ययन समृद्धी साहित्य संचातील साहित्याच्या आधारे वर्गात आपण प्रत्यक्ष कृती करून पाहणार आहोत व त्यामागील वाचन विकासाच्या टप्प्यांचा विचार समजून घेणार आहोत. मात्र आपल्या मुलांसाठी या संचातील साहित्याचा वापर करताना मुलांची भाषा, परिसर व मुलांचे भावविश्व यांचा विचार करून योग्य त्या साहित्याची (उदा. शब्द, खेळ, चित्रे, गाणी, गोष्टी इ.) भर घालायची आहे.

# १. प्रशिक्षणाची गरज, उद्दिष्टे, कार्यपद्धती व परिणामकारकता

शिक्षण हक्क कायद्यामधील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' हा कार्यक्रम कार्यान्वित केला आहे. प्रत्येक मूल शिकले पाहिजे हेच या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अनेक शिक्षकांच्या प्रयत्नातून ५८,३६६ शाळा डिजिटल झाल्या असून ३२,१६५ शाळा प्रगत झाल्या आहेत. सरकारी शाळांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा होत असली तरी अद्यापही १००% मुलांना शिकते करण्याचे ध्येय आपण गाठू शकलो नाही असे NAS, SLAS अशा शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणातून दिसून येते.

- **प्रशिक्षणाची गरज :** शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलाच्या वाचन व लेखनाच्या क्षमता विकसित झालेल्या असणे ही प्रत्येक मूल शिकण्यासाठीची प्राथमिक अट असते. आपल्या आयुष्यातील काही वर्षे शाळेत खर्च करूनही ज्या मुलांना वाचता येत नाही त्या मुलांना शिकण्यात गोडी वाटत नाही. अशी मुले अभ्यासात मागे राहतात. हीच परिस्थिती कायम राहिली तर शाळा सोडून देतात हे जगभरात झालेल्या संशोधनातून सिद्ध झाले आहे.

आपल्या राज्यातील १००% मुलांना शिकते करायचे असेल तर सर्वांत प्रथम त्यांचे पायाभूत वाचन कौशल्य विकसित होणे गरजेचे आहे. म्हणूनच सन २०१७-१८ या वर्षात इयत्ता पहिली ते पाचवीतील प्रत्येक मुलाच्या पायाभूत वाचन क्षमतेचा विकास हे उद्दिष्ट समोर ठेवून विद्या प्राधिकरणामार्फत पायाभूत वाचन क्षमता विकास : शिक्षण प्रशिक्षण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

- **प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट :** इ. पहिली ते पाचवीतील १००% विद्यार्थ्यांच्या पायाभूत वाचन क्षमतेचा विकास करणे. त्यासाठी प्रशिक्षणामधून -

  १) वाचन शिकण्याचे टप्पे व त्यासाठीची शिक्षकाची सुलभकाची भूमिका याबाबतच्या शिक्षकांच्या व पर्यवेक्षीय यंत्रणेतील व्यक्तींच्या संकल्पना स्पष्ट करणे.

  २) इयत्ता पहिली ते पाचवीत शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या पायाभूत वाचन क्षमतेचा विकास करण्यासाठी विद्यार्थीनिहाय कृतिकार्यक्रम तयार करण्याची शिक्षकांची क्षमता विकसित करणे.

- **वाचन व मूलभूत वाचन :**

  ➢ वाचन म्हणजे लिहिलेल्या किंवा छापलेल्या मजकुरातील अर्थ शोधणे.
  (अर्थ शोधण्याची प्रक्रिया आयुष्यभर चालू असते.)

  ➢ पायाभूत वाचन म्हणजे लिहिलेले शब्द ओळखणे आणि महत्त्वाची विरामचिन्हे लक्षात घेऊन उच्चारणे.
  लिहिलेला मजकूर काही एक अर्थ व्यक्त करण्यासाठी असतो हे समजणे अपेक्षित.
  (पाठ झालेला मजकूर उच्चारणे अपेक्षित नाही.)

  वाचायला शिकताना आपण जे बोलतो तेच शब्द कागदावर लिहिलेले असतात. लिहिलेले शब्द ओळखणे आणि महत्त्वाची विरामचिन्हे लक्षात घेऊन उच्चारणे हा वाचन क्षमता विकासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. अभ्यासक्रमातील उद्दिष्टांनुसार इयत्ता दुसरीतील विद्यार्थ्यांना या टप्प्यावरील वाचन करता येणे अपेक्षित आहे.

- **शैक्षणिक गुणवत्तेच्या परिणामासाठी प्रशिक्षण नियोजन : Piloting, Replication, Testing, Universalization**
  दि. ८ जून २०१७ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक गुणवत्तेच्या परिणामासाठी या प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी पुढील टप्प्यांमधून केली जात आहे.

  ➢ सातारा जिल्ह्यातील १००% मुलांना शिकते करण्यात यशस्वी झालेल्या कुमठे बीटमधील ४० शाळांमध्ये सलग ३ वर्षे परिणामकारक ठरलेल्या वाचन शिकवण्याच्या पद्धतीची निवड.

- २०१५–१६ व १६–१७ या वर्षात राज्यातील ७५,००० शिक्षकांच्या भेटी– त्यापैकी अनेकांनी ही पद्धती वापरून परिणाम मिळवला.
- २०१६–१७ मध्ये नागपूर, पुणे, बुलडाणा, बीड या जिल्ह्यातील ९ बीट मधील शिक्षकांनी स्वयंस्फूर्तीने कुमठे बीटमध्ये जाऊन प्रशिक्षण घेतले व परिणाम मिळवला.
- २०१६–१७ मध्ये औरंगाबाद आणि कोल्हापूर जिल्ह्यातील निफाड व गगनबावडा तालुक्यातील शिक्षकांना मागणीनुसार प्रशिक्षण देण्यात आले. हे तालुके प्रशिक्षणानंतर ३ महिन्याच्या कालावधीत स्वत:ला प्रगत घोषित करू शकले.
- सन २०१७–१८ या वर्षात राज्यातील मराठी माध्यमाच्या इ. पहिली ते पाचवीच्या शाळांमधील प्रत्येकी एक याप्रमाणे ७७,४३७ + ३,६८६ केंद्रप्रमुख यांचेसाठी प्रशिक्षणाचे नियोजन.

- **दि. ८ जून २०१७ च्या शासन निर्णयातील प्रशिक्षक तयार करण्याच्या तत्त्वाला अनुसरून प्रशिक्षक तयारी :**
  - **राज्यस्तर सुलभक निवड :** वाचन क्षमता विकासासंदर्भात परिणाम मिळवलेल्या व्यक्ती, DIECPD मधील विषय सहायक व वाचन विकास टप्प्यांवर यशस्वीपणे काम केलेले शिक्षक यांची निवड राज्यस्तर सुलभक म्हणून करण्यात आली.
  - **राज्यस्तर सुलभकांची तयारी :** (Making of ToTs)
    वाचन टप्प्यासाठी घ्यावयाच्या कृती व त्यामागील मानसिक, बौद्धिक विकासाच्या टप्प्यांचा विचार या संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी राजस्तर सुलभकांच्या प्रत्येकी ५ दिवसांच्या २ कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यांचे सुलभन कौशल्याचे प्रशिक्षणही यात अंतर्भूत होते. तालुकास्तरावरील सुलभकांना शिक्षक प्रशिक्षण घेताना काय अडचणी येऊ शकतात? हे समजून घेण्यासाठी २० जिल्ह्यातील प्रत्येकी एक बीट निवडून प्रायोगिक प्रशिक्षणाचा अनुभव देण्यात आला व या अनुभवाचे विश्लेषण करून प्रशिक्षण कार्यपद्धती व आनुषंगिक बाबींमध्ये सुधारणा करण्यासाठीची एक कार्यशाळा घेण्यात आली. त्यानुसार प्रशिक्षणात योग्य ते बदल करण्यात आले. (मे, जून व जुलै २०१७)
  - **तालुकास्तर सुलभक तयारी : १६३२ (प्रत्येक तालुक्यासाठी ४)**
    निवडीचे निकष : भाषेचे परिणामकारक अध्ययन–अध्यापन करणारे इ. पहिली ते पाचवीला शिकवणारे शिक्षक २/३, गटसाधन केंद्रातील मराठी विषय साधन व्यक्ती १, भाषा अध्ययन–अध्यापनासंदर्भात आपल्या केंद्रात परिणामकारक काम केलेले, प्रशिक्षणासाठी पूर्ण वेळ देऊ शकणारे केंद्रप्रमुख यांची निवड विषय सहायक, जि. सा. व्या. वि. संस्थेचे वरिष्ठ अधिव्याख्याता आणि व्याख्याता यांच्या मदतीने करण्यात आली.
  - **तालुकास्तर सुलभक प्रशिक्षण :** प्रादेशिक विद्या प्राधिकरण स्तरावर ५ दिवसांची (पैकी ३ दिवस प्रशिक्षण + दोन दिवस सुलभन कौशल्य सराव) कार्यशाळा घेण्यात आली व कार्यक्रमातील कृतींचे प्रात्यक्षिक त्यांनी वर्गात करून पाहिले.
  - **तालुकास्तर प्रशिक्षण :** प्रत्येक शाळेतील एक शिक्षक याप्रमाणे राज्यातील ७७,४३७ शिक्षक + ३,६८६ केंद्रप्रमुखांसाठी प्रत्येकी तीन/चार दिवसांचे प्रशिक्षण तालुका/बीट स्तरावर आयोजित करण्यात येत आहे. प्रशिक्षण घेतलेला शिक्षक केंद्र प्रमुखांच्या मदतीने आपल्या केंद्रातील इयत्ता पहिली ते पाचवीच्या इतर शिक्षकांना प्रशिक्षित करेल.

- **प्रशिक्षणाची परिणामकारकता : निदर्शक टप्पे**
  - शिक्षक वाचन क्षमतेत मागे असलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांची यादी निश्चित करतील.
  - मूल ज्या प्रक्रियेतून वाचायला शिकते त्या प्रक्रियेतील टप्पे बारकाईने विचारात घेऊन मागे पडलेले मूल नेमक्या कोणत्या टप्प्यावर आहे याची निश्चिती करतील.

- ➢ वाचन विकासाचे टप्पे, विद्यार्थ्याचा वयोगट व त्याची मातृभाषा या बाबी विचारात घेऊन विद्यार्थीनिहाय विशेष कृतिकार्यक्रमाची आखणी करतील.
- ➢ प्रत्येक विद्यार्थ्याला इयत्ता दुसरीच्या अखेरीस अपेक्षित काठिण्यपातळीचा मजकूर पूर्णविराम व स्वल्पविराम लक्षात घेऊन आत्मविश्वासपूर्वक वाचता येतो याची खात्री होईपर्यंत विशेष कृतीकार्यक्रम अंमलात आणतील.

- **प्रशिक्षण परिणामकारकता पडताळणी :**
  - ➢ प्रशिक्षण प्रक्रिया मूल्यमापन
    1. १) प्रशिक्षण पूर्व चाचणी – उत्तर चाचणी. (५० पैकी १०% गुण)
    2. २) वाचन विकास – कृती कार्यक्रम गुणांकन. (१० गुण)
    3. ३) शिक्षकांचा प्रशिक्षणातील सहभाग. (२० गुण)
    4. ४) प्रत्येक टप्प्यावर प्रशिक्षणाच्या व सुलभकांच्या परिणामकारकतेचे प्रशिक्षणार्थ्यांकडून मूल्यांकन (google form द्वारे)
  - ➢ शिक्षक प्रशिक्षणानंतर तीन महिन्यांनी प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांना अनुसरून १००% विद्यार्थ्यांच्या मूलभूत वाचन क्षमतेचा विकास झाला आहे का याची पडताळणी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत संकलित चाचणी २, २०१७–१८ आधारे तपासली जाईल. (६० गुण)
  - ➢ प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांचे प्रत्येक टप्प्यावर मूल्यांकन करून श्रेयांकासह प्रमाणपत्र दिले जाईल व दि. २८ जून २०१७ च्या शासन निर्णयानुसार त्याची नोंद PAR मध्ये घेण्यात येईल.

- **परिणामासाठी प्रशिक्षण पर्यवेक्षण :**
  - ➢ केंद्रप्रमुखांसाठी तीन/चार दिवस व सर्व पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांसाठी सारांशाने (Capsul mode) प्रशिक्षण दिले जाईल.
  - ➢ पर्यवेक्षीय अधिकारी आपापल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या वाचन क्षमतेच्या विकासासाठीची प्रक्रिया परिणामकारक होण्यासाठी पर्यवेक्षण करतील.
  - ➢ **केंद्रातील शिक्षकांच्या मूल्यांकनाच्या सरासरीवरून केंद्रप्रमुखाच्या परिणामकारकेचे मूल्यांकन केले जाईल. वरच्या स्तरातील सर्व अधिकाऱ्यांच्या कामाचे मूल्यांकनही याच पद्धतीने केले जाईल.**
  - ➢ संबंधित अधिकारी कार्यक्रम अंमलबजावणीच्या तीन महिन्यांच्या कालावधीत शाळाभेटी करून वर्गात अपेक्षित प्रक्रिया होत आहेत याची खातरजमा करतील.

- **प्रशिक्षणातील कार्यपद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये :**
  - ✓ शिक्षकांसाठी आनंददायी, कृतियुक्त व प्रत्येक मुलाचा विचार करण्यासाठी उद्युक्त करणारी.
  - ✓ १००% मुलांची मूलभूत वाचन क्षमता विकसित करण्यासाठी वर्गात ज्या कृती मुलांना द्यावयाच्या आहेत त्या कृती शिक्षक या प्रशिक्षण वर्गात स्वत: करतील.
  - ✓ कृती केल्यानंतर त्यांचे उद्दिष्ट काय होते? मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेतील कोणत्या टप्प्याच्या विकासास यामुळे मदत होईल? कोणत्या मुलांसाठी कोणत्या क्रमाने अशा प्रकारच्या कृती द्यायच्या? कृतीमागचे उद्दिष्ट लक्षात घेऊन; स्थानिक परिस्थितीतील साधने वापरून; कोणत्या समांतर कृती घेता येतील? या प्रश्नांची उत्तरे शिक्षक स्वत: शोधतील.

◈◈◈

# २. समता : का व कशी?

माणसांमध्ये दोन प्रकारच्या असमानता समजल्या जातात. एक–सामाजिक, आर्थिक, धर्म, जात, वर्ग यानुसारची असमानता. दोन– शरीर रचनेनुसार स्त्री, पुरुष, दिव्यांग आणि अन्यलिंगी. पहिल्या प्रकारची असमानता मानवनिर्मित आहे. दुसऱ्या प्रकारची असमानता नैसर्गिक आहे. असे असले तरी दोन्ही प्रकारातील माणसे ही 'माणसेच आहेत. म्हणून शाळेत आलेले प्रत्येक मूल हे 'मूल' आहे. या मुलांकडे जात, धर्म, स्त्री, पुरुष, गरीब, श्रीमंत असे न बघता त्याच्याकडे मूल म्हणून बघावे. आपल्या राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्त्वे स्वीकारली आहेत म्हणून समता प्राप्त होणे हा मुलासह प्रत्येकाचाच घटनात्मक अधिकार आहे. समता म्हणजे ज्याची जेवढी गरज आहे तेवढं देणं. समानता म्हणजे प्रत्येकाला समान देणं.

बोलायचं सोपं आहे, प्रत्यक्ष शाळेत कशी कृती करावी हे समजून घेणं अधिक महत्त्वाचे आहे. जी मुलं शाळेत येत नाहीत, ज्यांच्या शिकण्यात अडथळा वाटतोय, ज्यांना वाचता येत नाही ही मुले कोण आहेत? कोणाची आहेत? यांचे पालक कोण आहेत? यातील बहुतांश मुले गरिबांची, मजुरांची, कष्टकऱ्यांची, अदिवासींची, मागासवर्गीयांची, झोपडपट्टीतील, अशिक्षित पालकांची, वेगळी बोली असणाऱ्यांची आहेत. यामध्ये दिव्यांग आणि मुलीसुद्धा आहेत.

दुसरा प्रश्न, जी मुलं शिकत आहेत, ज्यांना वाचता येत आहे त्यांचे पालक कोण आहेत? बहुतांशपणे ज्यांचे आई–वडील सुशिक्षित आहेत, नोकरीला आहेत, घरात शैक्षणिक वातावरण आहे अशांची मुले शिकत आहेत.

तिसरा प्रश्न, जी मुलं शिकत नाहीत, ज्यांना वाचता येत नाही त्यामध्ये शिक्षक, नोकरदार अधिकारी यांची मुलं आहेत का? असतील तर त्याचं प्रमाण किती आणि वंचित घटकातील या अगोदर चर्चा केलेल्या मुलांचं प्रमाण किती? पुढचा प्रश्न, जी मुलं शिकत नाहीत, ती का शिकत नाहीत? किंवा इतर मुलांच्यापेक्षा ती मागे का आहेत? प्रत्येक मूल हे माणसाचे मूल आहे. सर्व माणसे समान आहेत. प्रत्येक मुलाकडे शिकण्याची क्षमता आहे. ते शिकू शकते तरी काही मुले सर्वांसारखी अपेक्षित असे का शिकत नाहीत?

मूल त्याच्या परिसरातून शाळेत येते तेव्हा ते बरेच काही शिकलेले असते. शाळेत औपचारिक शिक्षणात लेखन–वाचनासारख्या गोष्टी शिकायला सुरुवात होते. ज्यांच्या घरात शैक्षणिक वातावरण आहे ती मुलं थोडंफार शाळेत, पहिलीच्या वर्गात प्रवेश घेण्यापूर्वीच शिकलेली असतात. गणितातील संख्याज्ञान, अंकज्ञान झालेले असते. काही मुलांची पहिली पिढी शाळेत येत असते. शाळेत मूल प्रवेश घेते त्यावेळी शिकण्याच्या स्तराची असमानता असते. ज्यावेळी वर्गात शिकवायला सुरुवात होते तेव्हा घरात शैक्षणिक वातावरण असलेली मुलं सर्वसाधारणपणे भरभर शिकत पुढे जातात. त्यांचं कौतुक होतं. आत्मविश्वास वाढतो. बहुतांश शिकवणारे भरभर शिकणारांबरोबर असतात. मागचे मागेच असतात. ज्यांच्या लेखन, वाचन आणि शिकण्याची सुरुवात शाळेत होते तीही मुलं असतात. आपणास येत नाही. आपल्यात कमतरता आहे. हा न्यूनगंड त्यांच्या मनात निर्माण होतो. त्यांना आत्मसन्मान मिळत नाही. आत्मविश्वास कमी होतो. ही मुले अबोल होतात. पाठीमागे बसतात.

आम्ही म्हणतो आम्ही सर्वांना समान शिकवलं. ही मुलं शिकत नाहीत यात आमचा काय दोष? हे ज्याचं पोट भरलंय त्याला एक भाकरी देणं आणि जे उपाशी आहेत त्यांनाही एक भाकरी देणं असं झालं. खरेतर जे उपाशी आहेत, ज्यांची भूक अधिक आहे त्यांना अधिक द्यायला हवे. त्यांची जेवढी गरज आहे तेवढं द्यायला हवं. अगोदर शिकलेल्या मुलांच्याबरोबर ही मुलं येईपर्यंत त्यांना घ्यायलाच हवं.

आम्ही या मुलांना समान दिले पण समतेचा विचार केला नाही. पुढे तर आपण शिकवत राहतो पण जे शिकवतो ते त्यांना समजत नाही कारण आपण शिकवतो त्याच्या खूप मागे असतात ही मुले. शिकवणे आणि न शिकवणे त्यांच्या दृष्टीने सारखं असतं.

एखादं झाड तोडलं तर तुटलेल्या बुंध्याला पालवी फुटते. पुन्हा तोडलं तर परत पालवी फुटते. भिंतीच्या फटीत वड, पिंपळाची रोपटी उगवतात. ती तोडली तर पुन्हा पुन्हा पालवी फुटते पण रोप मरत नाही. काहीवेळा भिंत पाडावी लागते पण

झाड मरत नाही. प्रत्येक जिवाला जगण्याची अंतरिक प्रेरणा असते. हे नैसर्गिक आहे. झाड जगण्यासाठी एवढं झगडत असेल तर आपली तर माणसांची मुले आहेत. त्यांच्याकडे किती शक्ती, किती प्रेरणा असेल! प्रत्येक मुलाला शिकायचं आहे. शिकणं नैसर्गिक  आहे. मग ते भिकाऱ्याचं मूल असो अथवा उद्योगपतीचं!

ऊसतोड कामगार १२–१३ वर्षाच्या मुलांना ऊसतोड करण्यासाठी आपल्याबरोबर नेतात. या मुलांना मोठ्या माणसांपेक्षा अर्धी मजुरी मिळते. म्हणून त्यांना अर्धा कोयता म्हणतात. अशी खूप मूलं साखर कारखाने सुरू झाले की शाळाबाह्य होतात. वरवंडी तांडा येथील मुलं अशाप्रकारे शाळाबाह्य व्हायची या मुलांना शाळेत थांबवण्यात तिथल्या शिक्षकांनी यश मिळवलंय. अर्धे कोयते फडात जात नाहीत.

काही वेळा ऊसतोड कामगारांच्या टोळीचा मुक्काम शाळेच्या जवळ असतो. तिथली लहान मुलं हमखास वर्गाच्या खिडकीतून आत बघत असतात. त्यांना शिकायचं असतं. त्यांना त्याचं बालपण हवं असतं. मुलांत मिसळावं वाटतं. भीक मागून जगणारी मुलं शाळेत येत आहेत. रस्त्यावर, चौकातल्या वाहतूक सिग्नलजवळ वस्तू विकून पोट भरणारी मुलं शाळेत येत आहेत. तरीही शिक्षणाविषयी अनास्था असा शिक्का का मारतो आपण!

जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर; दरोडेखोरांकडून एका घोड्याच्या बदल्यात घेतलेलं गुलामाचं पोर. ते इतकं आजारी आणि अशक्त होतं की कधी मरेल सांगता येत नव्हतं. गोठ्यात राहून, चणे–फुटाणे खाऊन, उपाशी राहून हे मूल शिकतं; शेकडो शोध लावतं. एडिसनला आम्ही मतिमंद ठरवतो. शाळेतून बाहेर ढकलतो. त्याला गरजेइतकं देणं खूप दूर. तो शिकतो. रेल्वेच्या डब्यात प्रयोगशाळा तयार करतो. दोन वेळा प्रयोगशाळा जळून खाक होते. तो उमेद हरत नाही. तो शोध लावतो बल्बचा. आम्ही त्याला अंधारात ढकलतो आणि तो आम्हाला प्रकाश देतो. अशी खूप उदाहरणे देता येतील ज्यांना शिकायचं होतं. गळायचं नव्हतं तरी आम्ही त्यांना बाहेर ढकललं अशी उदाहरणं दिली की, याकडे आम्ही अपवाद म्हणून बघतो. स्वतःची दृष्टी बदलण्याऐवजी सुटका करून घेतो.

आपण शाळेत शिकत होतो तेव्हा यापैकी बहुतेकांना इंग्रजी शिकण्यात अडथळा येत होता. बाकी सर्व विषयात अडचण नव्हती. असं कसं? इथं ना आपल्या पालकांची शिक्षणाविषयी अनास्था होती ना आपली.

शिकवलेलं समजत नाही याचा अर्थ जे मागे आहेत त्यांची शिकण्याची पात्रता नाही, असे नाही. शिक्षणाविषयी अनास्था आहे असे तर अजिबात नाही. तर अशांसाठी आपण शिकण्याचं वातावरण तयार केलेल नाही. समता आणायची असेल तर याचा विचार करायला हवा. प्रत्येकाला एकच पद्धत वापरून कसं समजेल? पद्धत बदलून बघायला पाहिजे. शिकविण्याची साधनं बदलायला हवीत. प्रसंगी शिकविणाराही बदलायला हवा. कधी असे मूल गटात शिकेल, कधी मित्राकडून शिकेल, एखादी गोष्ट दुसऱ्या शिक्षकांकडून शिकेल. समता आणायची असेल तर अशा मुलांचा केस स्टडी करायला हवा. शिकण्याचा कृती आराखडा करायला हवा.

कधीतरी मुलाला आपण नकळत काही बोललो, रागवलो किंवा दुसऱ्या मुलाला मारलं तरी एखादं मूल भीती बाळगतं. मुलाच्या मनात कशाचीही भीती असू शकते. ही भीती त्याच्या शिकण्यातला अडथळा ठरू शकते. हा अडथळा दूर करावा लागेल. इतर मुलांपेक्षा अशा मुलांना अधिक प्रेमाची, अधिक विश्वासाची, अधिक जिव्हाळ्याची गरज आहे. मुलाला शाळेत निर्भय आणि सुरक्षित वाटायला हवं.

शिकविण्याची पद्धत बदलणे, शिकविणारा बदलणे, मुलाला प्रेम देणे, भावनिक पातळीवर आधार देणे या मुलाच्या गरजा आहेत. एखाद्याची ती गरज नसेल पण ज्याची आहे, त्याला द्यायला हवं. इथं आपण सर्व मुलांची गरज म्हणून इतरांबरोबर देत नाही, तर या मुलाची गरज इतरांपेक्षा वेगळी आहे ती त्याची गरज पूर्ण करणं हा समतेचा दृष्टिकोन आहे. समता म्हणजे न्यायानं वागणं. बालक कुपोषित आहे म्हणून त्याला फक्त जादा आहार देऊन चालणार नाही, तर त्याला हवा असणारा 'विशेष आहार' द्यावा लागेल. त्याला हवा तो हवा तेवढा आहार देणं म्हणजे त्याच्याशी न्यायानं वागणं, समतेनं वागणे.

◈◈◈

# ३. बहुभाषिक विद्यार्थ्यांचे भाषा शिक्षण

- **भाषा शिक्षणात मुलांच्या मातृभाषेचा विचार : गरज**

प्रत्येक मूल शिकू शकते हे राष्ट्रीय अभ्यासक्रम, २००५ चे मूलभूत तत्त्व आहे. त्याही पुढे जाऊन 'प्रत्येक मूल शिकून प्रगत झाले पाहिजे' या उद्‌देशाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' हा कार्यक्रम राज्याने २२ जून २०१५ पासून कार्यान्वित केला आहे. या कार्यक्रमानुसार प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये वाढ करण्यासाठी सुरुवातीला प्रथम भाषा आणि गणित या विषयात १००% विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविण्याचे उद्‌दिष्ट ठरविण्यात आले होते.

'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमातील पायाभूत व संकलित चाचण्यांमधून प्राप्त माहितीच्या विश्लेषणातून दिसून येते की राज्यात सर्वांत कमी गुणवत्ता असलेल्या ५० केंद्रांपैकी ४४ केंद्रे ही आदिवासी बोलीभाषा बहुल क्षेत्रातील आहेत. येथील मुलांची मातृभाषा आणि शाळेतील/पुस्तकातील मराठी यातील भिन्नता हे 'शाळेत येऊनही मूल शिकते न होण्याचे' एक प्रमुख कारण आहे.

भाषा हे संवादाचे, स्वतःच्या भावना, कल्पना, विचार इत्यादी अभिव्यक्त करण्याचे आणि समजून घेण्याचे एक सशक्त साधन आहे. एवढेच नव्हे तर विचार करणे, भावना किंवा जाणीव होणे, प्रतिसाद देणे यासाठीही भाषा महत्त्वाची असते. भाषा येत नसल्यामुळे गणित, सामाजिक शास्त्रे, विज्ञान इत्यादी अभ्यासक्रमीय विषयातील संबोध विकसित होण्यात अडचणी येतात.

महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने, (महाराष्ट्र विद्या प्राधिकरण) २०१४ साली प्रसिद्ध केलेल्या राज्य संपादणूक सर्वेक्षणानुसार राज्यातील २८% मुलांची शाळेची भाषा त्यांच्या घरच्या भाषेपेक्षा भिन्न आहे. डॉ. गणेश देवी यांच्या नेतृत्वाखालील संशोधक समूहाने केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यात मराठीच्या १३ बोली भाषा, २३ आदिवासी भाषा आणि १९ भटक्या विमुक्तांच्या भाषा बोलल्या जातात. याशिवाय राज्यातील सीमावर्ती भागात आणि कामानिमित्त राज्यात स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबातील मुलांचे प्रमाण वाढते असल्याने मोठ्या शहरांमध्येही अनेक वेगवेगळ्या भाषा बोलणारी मुले मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकत आहेत.

मुलाच्या शाळा प्रवेशाच्या वेळी भाषा ही जर त्याच्या घर आणि परिसरातून आत्मसात केलेल्या भाषेपेक्षा वेगळी असेल तर शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच त्यांना 'अगम्य भाषेतून अगम्य संबोध शिकण्याच्या त्रासाला सामोरे जावे लागते'. मातृभाषेपेक्षा भिन्न भाषा शिकण्याची प्रक्रिया जर सहज, दबाव व तणाव विरहित असेल तरच भाषा शिकणे सुकर होते. अन्यथा न्यूनगंड, भीती, अनास्था निर्माण होते व बालकाच्या शिकण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात; परिणामी मूल हळूहळू शिकण्याच्या प्रवाहातून बाजूला फेकले जाते. त्यामुळे 'प्रत्येक मूल शिकून प्रगत होणे' हे ध्येय गाठण्यासाठी मुलाच्या मातृभाषेचा विचार करून वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेची आखणी करणे आवश्यक ठरते.

- **जागतिक स्तरावरील संशोधने :**

ज्या मुलांची मातृभाषा शिक्षणाच्या माध्यम भाषेपक्षा भिन्न असते अशा मुलांच्या भाषेच्या अध्ययन-अध्यापनावर जागतिक स्तरावर अनेक संशोधने झाली आहेत. सर्व भाषांच्या नियमव्यवस्थांमध्ये काही एक समानता असते. (There is an underlying cognitive academic proficiency that is common across languages) मुलाने आत्मसात केलेल्या एक भाषेच्या ज्ञानाचा उपयोग दुसऱ्या भाषेची नियमव्यवस्था आत्मसात करण्यासाठी होतो. या निष्कर्षांना अनेक संशोधनातून पुष्टी मिळाली आहे. म्हणून मुलांच्या बहुभाषिकत्वाचा संसाधन म्हणून वापर करणे परिणामकारक ठरते असे म्हणता येते. Auerbach (१९९३) यांना त्यांच्या प्रयोगात ***'मातृभाषेचा उपयोग केवळ परिणामकारक नव्हे तर आवश्यक ठरतो कारण प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर त्या त्या (जादाच्या) बोलीतील भाषिक स्रोत अत्यंत फायदेशीर असतात.'*** असे आढळून आले आहे. **(संदर्भ :** Jim Cummins, ***Rethinking monolingual instructional strategies in multilingual classrooms,*** Ontario Institute for Studies in Education, University of Toranto).

बहुविध माध्यमातील द्वैभाषिक साहित्यामुळे मुलांमध्ये स्वत्व, स्वाभिमानाची भावना दृढ होण्यास मदत होते; वाचन-लेखनाच्या पर्यायाने शिकण्याच्या प्रक्रियेस चालना मिळते आणि ती टिकून राहण्यास मदत होते. ज्या अल्पसंख्यांक समाजातील मुलांच्या भाषेला बहुसंख्य समाजाकडून महत्त्व दिले जात नाही त्या मुलांच्या मनात स्वत:च्या द्वैभाषिकतेबद्दल अभिमानाची भावना निर्माण होण्यास मदत होते.

शाळेत मुलांची मातृभाषा आणि शिकावयाची भाषा यामध्ये मोठ्या प्रमाणात संवादात्मक आंतरक्रिया घडून आल्या तर मुलांच्या इच्छित भाषेच्या विकासास चालना मिळते. (Interaction of languages can enhance as of overall language and literacy development.)

**या सर्व संशोधनाच्या निष्कर्षांतून असे दिसून येते की शिकण्याच्या भाषेपेक्षा वेगळी मातृभाषा असलेल्या मुलांना इच्छित भाषा शिकवताना त्यांच्या मातृभाषेचा संसाधन म्हणून वापर करणे केवळ उपयुक्त नव्हे तर परिणामकारक ठरते.**

- **महाराष्ट्रातील सद्यस्थिती :**

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विद्या प्राधिकरणामार्फत महाराष्ट्रातील सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासगटाला शिक्षक व पर्यवेक्षीय यंत्रणेतील बहुतांश व्यक्तींचा मुलांच्या बहुभाषिकतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन अशी मुले शिकती होण्यासाठी योग्य नाही असे दिसून आले. बहुतांश शिक्षकांना विद्यार्थ्यांची बोली येत नाही. *'विद्यार्थ्यांची बोली वेगळी असली तरीही त्यांना थोडीफार मराठी समजते. विद्यार्थ्यांना मराठी शिकायचे आहे'* त्यामुळे विद्यार्थ्यांशी त्यांच्या बोलीभाषेतून संवाद साधण्याची गरज शिक्षकांना वाटत नाही. त्यामुळे बोली भाषा जाणणारे काही शिक्षकही अध्ययन-अध्यापनात बोलीचा वापर करणे टाळतात.

पालक व शिक्षक यांना त्यांच्या बोलीबद्दल न्यूनगंड आहे. विद्यार्थ्यांनी त्यांची बोली शाळेत वापरू नये असा पर्यवेक्षीय यंत्रणेचाही दृष्टिकोन आहे. शाळेत विद्यार्थ्यांच्या भाषेचा स्वीकार व सन्मान होत नाही. वर्गात/शाळेत विद्यार्थ्यांना त्याच्या बोलीतून अभिव्यक्त होण्याची संधी अपवादानेच मिळते. बहुतांश शिक्षक बहुभाषिक अध्यापन पद्धतीबाबत अनभिज्ञ आहेत. त्यामुळे मुलांची भाषा शिक्षणातील प्रगती असमानधानकारक आहे.

भिन्न भाषा बोलणाऱ्या मुलांना मराठी भाषा शिकवताना येणाऱ्या अडचणींचा विचार करून विद्या प्राधिकरण तसेच बोली भाषा बहूल जिल्ह्यातील DIECPD मार्फत आदिवासी भाषांमध्ये शब्दकोश, वाक्यकोश, कथा, कवितासंग्रह, शिक्षक हस्तपुस्तिका इ. प्रकारचे साहित्य परिश्रमपूर्वक विकसित केलेले आहे. मात्र शिक्षकांच्या सक्षमीकरणासाठी व मुलांच्या भाषा शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी या साहित्याचा परिणामकारक वापर अपवादानेच होत असल्याचे दिसून येते.

- **शिक्षकांनी मुलांची भाषा का शिकावी?**

शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया ही शाळेतील मुलांच्या शिकण्यासाठीची सर्वांत प्रथम महत्त्वाची असलेली क्रिया आहे. शिक्षकांना मुलांची आणि मुलांना शिक्षकाची भाषा समजत नसेल तर मुलांचे शिकणे सुरू होण्यातच अडचण निर्माण होते. म्हणून मुले शिकती होण्यासाठी सर्वांत प्रथम शिक्षकाला मुलांची भाषा समजली पाहिजे आणि निदान दैनंदिन व्यवहारापुरती बोलताही आली पाहिजे.

शिक्षकांना मुलांची भाषा शिकण्यासाठी त्या-त्या भाषेचे शब्दकोश उपलब्ध आहेत. ते उपयुक्त असले तरी प्रत्येक दर १२ कोसावर बदलणारी भाषेची रूपे, नजीकच्या प्रांतातील भाषेच्या प्रभावामुळे त्या-त्या भागात बोलल्या जाणाऱ्या भाषेत प्रचलित झालेले नवे शब्द यामुळे भाषा एकच असली तरी मुलांच्या बोलीत फरक असतो. म्हणून शिक्षकांनी प्राधान्याने त्यांच्या वर्गातील मुलांकडूनच निदान दैनंदिन व्यवहारातील वापरापुरती त्यांची भाषा शिकणे आवश्यक आहे. त्यासाठी दररोज काही नव्या शब्दांची भर घालीत स्वत:चा हस्तलिखित शब्दकोश तयार करणे परिणामकारक ठरते. त्यासाठी गरजेनुसार परिसरातील व्यक्तींची/पालकांची मदत घेता येईल. त्यामुळे भाषा शिकण्याबरोबरच आणखी काही उद्दिष्टे साध्य होण्यास मदत होईल.

१) आपल्या भाषेविषयी शिक्षकाला आपलेपणा वाटतो, आपल्या भाषेचा शिक्षकाकडून सन्मान केला जातो याचा अनुभव मुलांना येईल. त्यामुळे शिक्षकांबद्दल आपलेपणा, जवळीक निर्माण होईल.

२) मुलांमध्ये असलेली आपल्या भाषेबद्दलची न्यूनगंडाची भावना कमी होण्यास मदत होईल.

३) शिक्षक 'आपल्याकडून शिकतात' या अनुभवामुळे मुलांमधील आत्मविश्वास वाढेल. परिणामी त्याचे शिकणे सुकर होईल.

४) मुलांना त्यांच्या दृष्टीने नवी असलेली भाषा शिकवण्यासाठी शिक्षकाला 'मुलांच्या भाषेतील शब्द' हे संसाधन प्राप्त होईल.

५) शाळेत आपल्या भाषेत व्यक्त होणारी संधी मिळाल्यामुळे मुलांचे स्व–अभिव्यक्ती कौशल्य विकसित होण्यास मदत होईल.

६) आपल्या भाषेचा शाळेत सन्मान होतो हे पाहून पालक शाळेशी जोडले जातील.

७) भाषांचे वैविध्य हा आपला सांस्कृतिक ठेवा जपण्यास नकळतपणे मदत होईल.

- **बहुभाषिक विद्यार्थ्यांचा मूलभूत वाचन क्षमता विकास**

राज्यात इ. १ली ते ५वी तील १००% विद्यार्थ्यांसाठी मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे. यामधील मुलांच्या वाचन क्षमता विकासाचे टप्पे व त्यामागील विचार लक्षात घेऊन बहुभाषिक विद्यार्थ्यांना वाचन शिकविण्यासाठी या कार्यक्रमात (अध्ययन साहित्य आणि पद्धती) यामध्ये काही बदल करावे लागतील. हे बदल करीत असताना बहुभाषिक मुलांच्या शिक्षणाबाबत अनेक देशांमध्ये झालेल्या संशोधनातून सिद्ध झालेली पुढील मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेतली आहेत.

➢ पूर्वज्ञानाच्या पायावरच नव्या ज्ञानाची रचना होत असते; म्हणून मुलांच्या मातृभाषेच्या पूर्वज्ञानाचा उपयोग करीत (इमारतीच्या उंच भागावरील काम करण्यासाठी तयार केली जाणारी फळ्यांची परात - Scaffolding) मराठी वाचन क्षमता संपादनाचे उद्दिष्ट साध्य करणे. त्यासाठी मुलांच्या भाषिक पूर्वज्ञानाच्या आधारे मराठी भाषेचा (देवनागरी लिपीचा) परिचय करून देणे.

➢ पूर्वज्ञान हे केवळ महिती आणि कौशल्यांशी निगडित नसते तर ते मुलाच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणाऱ्या त्याच्या समग्र अनुभवांशी निगडित असते. म्हणून मुलांच्या परिसरातील परिचित संदर्भांचा समावेश अध्ययन साहित्यात करणे. (Integrating factual knowledge with conceptual framework.)

➢ परिचित मजकूर – परिचित चित्रे/अनुभव, परिचित मजकूर – अपरिचित चित्रे/अनुभव, अपरिचित मजकूर – परिचित चित्रे/अनुभव आणि शेवटी अपरिचित मजकूर – अपरिचित चित्रे/ अनुभव या क्रमाने भाषा शिक्षणासाठीच्या अध्ययन अनुभवांची रचना करणे.

➢ दोन्ही भाषांच्या मदतीने अर्थ समजून घेण्याची प्रक्रिया भिन्न भाषिक मुलांच्या परस्पर संबंधामधील ताण कमी करण्यास मदत करू शकते. म्हणून वर्गात अनेक भाषा बोलणारी मुले असतात तेव्हा मुलांना आपापल्या भाषेतून एकमेकांशी संवाद साधण्याची संधी देणे.

संशोधनातून प्राप्त झालेली वरील मार्गदर्शक सूत्रे, पायाभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रमातील वाचन क्षमता विकासाचे टप्पे व त्यामागील विचार आणि आदिवासी बोलीभाषिक विद्यार्थ्यांना वाचन शिकविण्यात यशस्वी झालेल्या शिक्षकांचे अनुभव या आधारे आपल्याला आपल्या वर्गातील मुलांना वाचन शिकविण्याच्या पद्धतीत बदल करणे व त्यासाठी आपआपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या मातृभाषेस अनुसरून अध्ययनसाहित्य तयार करणे आवश्यक आहे.

वाचन क्षमता विकासासाठी मुलांच्या भाषेतील शब्दांच्या साहाय्याने मराठी लिपीचा परिचय करून द्यावयाचा आहे. त्यासाठीची पूर्वतयारी म्हणून आपल्याला किमान पुढील गोष्टी करणे अत्यावश्यक आहे :

१) मुलांची भाषा किमान दैनंदिन संभाषणासाठी आवश्यक पातळीपर्यंत आत्मसात करणे.

२) मुलांच्या भाषेतील गाणी, गोष्टी इ. साहित्य संकलित करणे.

३) स्थानिक परिसरातील पशू–पक्षी, झाडे, वस्तू, निसर्गरूपे, सण, उत्सव, रीतिरिवाज, परंपरा इ. मुलांना परिचित व आपल्याशा वाटणाऱ्या गोष्टींच्या चित्रांचा संग्रह करणे.

- **बहुभाषिक विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके व वाचन साहित्य :**

मुलांना राज्यभाषा मराठीतून वाचते करण्यासाठी मुलांच्या बोलीतील शब्दांचा वापर करून मराठी लिपीचा परिचय करून देण्यासाठी जे अध्ययन साहित्य तयार करायचे आहे त्याचा आपापला आराखडा आपण या प्रशिक्षणात तयार करणार आहोत. पण पाठ्यपुस्तकाचे काय? राज्यात नेमलेले पाठ्यपुस्तक शिकविताना बोलीबहुल क्षेत्रातील शिक्षकांना अडचणी येतात. त्यासाठी काही जिल्हा शैक्षणिक साहित्य व्यावसायिक विकास संस्थांनी ती भाषा येणाऱ्या शिक्षकांच्या मदतीने इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी द्वैभाषिक पाठ्यपुस्तके तयार केली आहेत. काही शिक्षकांनी बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील पाठ, कथा, कविता स्थानिक मुलांच्या भाषेमध्ये भाषांतरित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही पुस्तके मुलांची भाषा न समजणाऱ्या शिक्षकांना पाठ्यपुस्तकातील आशय मुलांना समजून देण्यासाठी उपयुक्त आहेत. मात्र मुळात पाठ्यपुस्तक हे मुलांना भाषा शिकविण्यासाठी तयार केलेले एक अध्ययन साहित्य असते. 'ज्ञाताकडून अज्ञाताकडे' या सूत्रानुसार सुरुवातीच्या टप्प्यावर अध्ययन साहित्यातील मजकूर व चित्रे मुलांच्या परिसरातील, भावविश्वातील, अनुभवविश्वातील असतील तरच हा मूळ उद्देश साध्य होईल. पाठ्यपुस्तके भाषांतरित करताना हा संदर्भीकरणाचा (contextualization) अत्यंत महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित राहता कामा नये.

इयत्ता पहिली व दुसरीच्या वर्गासाठी एकच मोठे पाठ्यपुस्तक तयार करण्याऐवजी छोटी छोटी अनेक पुस्तके तयार करता येतील. त्यामुळे शिकण्याच्या टप्प्यानुसार मजकूर चित्रांचे प्रमाण आणि परिचित–परिचित संदर्भांचा क्रम याचाही योग्य विचार करणे शक्य होईल. हे आपले वाचन साहित्य तयार करण्यासाठी स्थानिक भाषा बोलणारे अनुभवी शिक्षक, त्या–त्या समाजातील ज्ञानी व्यक्ती, त्या–त्या भाषेत लिहिणारे लेखक, कवी, कारागीर, चित्रकार, अनुभवी शेतकरी इ. प्रकारच्या व्यक्तींची मदतही घेता येईल.

- **भाषासमृद्ध वातावरण :**

अध्ययन साहित्य, वाचन साहित्य याशिवाय शाळेतील भाषासमृद्ध वातावरण मुलांना भाषा शिकण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे काम करते. त्यासाठी शाळेत :

- ➢ शिक्षकांनी आवश्यकतेनुसार वर्गात मुलांची भाषा वापरणे, (त्यासाठी मुलांच्या मदतीने स्वत:चा शब्दकोश तयार करणे.)
- ➢ शाळा पातळीवर शिक्षकांनी मुलांना आपापल्या बोलीभाषेत अभिव्यक्त होण्यासाठी प्रोत्साहन देणे, मुलांनी स्वानुभवावर आधारित लिहिलेल्या विविध रूपातील (उदा. कथा, कविता, प्रसंग, वर्णने, निवेदने, पत्रे इ.) साहित्याचे शाळेत प्रदर्शन भरविणे.
- ➢ शाळेत पालकांचे कार्यक्रम आयोजित करणे. (पारंपरिक गाणी, नृत्य, कथा, नाटके)
- ➢ मौखिक, स्थानिक, पारंपरिक साहित्याचे देवनागरीत संकलन करणे.
- ➢ निवडक साहित्याचे संकलन व संपादन करून त्याची पुस्तके (हस्तलिखित अथवा टंकलिखित स्वरूपात) शाळेच्या वाचनालयात ठेवणे. त्याचा वापर इतर मुलांसाठी वाचन साहित्य म्हणून करणे.

आपली मुले शिकावीत म्हणून आपण करीत असलेल्या प्रयत्नांची दिशा आपण विचारपूर्वक निवडली तर त्यातून शिक्षक म्हणून आपण करीत असलेले काम अधिक परिणामकारक आणि अधिक आनंदाचे होईल. त्यातून आपणही शिकते होऊ आणि आपली मुलेही!

◈◈◈

# ४. प्रशिक्षणाचे वेळापत्रक

## (मराठी परिसर भाषा असणाऱ्यांसाठी)

| सत्र क्र. | वेळ | दिवस १ | दिवस २ | दिवस ३ |
|---|---|---|---|---|
| १ | १०.०० ते ११.१० | पूर्वचाचणी, प्रशिक्षणाची गरज, उद्दिष्टे, स्वरूप व परिणामकारकता | श्रवण अनुभव : भाग १<br>ध्वनिभेद ते सहभागी वाचन (कृती क्र. १ ते ५) | वाचन : भाग २<br>उपस्थिती पत्रक ते चित्रवाक्य (कृती क्र. ११ ते १४) |
| २ | ११.१० ते १२.२० | समता ते वाचन क्षमता | श्रवण अनुभव : भाग २<br>संवाद ते सूचना (कृती क्र. ६ ते ८) | वाचन : भाग ३<br>वाचन पाठ ते जोडाक्षरे (कृती क्र. १५ ते १९) |
| | १२.२० ते १२.३० | चहापान | | |
| ३ | १२.३० ते १.४० | बहुभाषिक मुलांचे भाषा शिक्षण | भाषण संभाषण : भाग १<br>स्व ओळख ते प्रश्न विचारणे<br>(कृती क्र. १ ते ५) | वाचन : भाग ४<br>चित्रमय उतारे ते आदर्श प्रकट वाचन<br>(कृती क्र. २० ते २२) |
| | १.४० ते २.३० | भोजन | | |
| ४ | २.३० ते ३.४० | शिक्षण पूरक कृती १<br>(कृती क्र. १ ते ६) | भाषण संभाषण : भाग २<br>घटनाक्रम ते थीम (कृती क्र. ६ ते १०) | कृतिकार्यक्रम |
| | ३.४० ते ३.५० | चहापान | | |
| ५ | ३.५० ते ५.०० | शिक्षण पूरक कृती २<br>(कृती क्र. ७ ते ११) | वाचन : भाग १<br>चित्र वाचन ते वेगळा ओळखा (कृती क्र. १ ते १०) | उत्तर चाचणी, Online Link भरणे |
| ६ | ५.०० ते ५.२० | कृतिकार्यक्रम संकल्पना | कृतिकार्यक्रम चर्चा/शंका समाधान | – |

**महत्त्वाचे :**

- पहिल्या दिवसाच्या अखेरीस सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना 'कृती कार्यक्रम' या लेखाच्या आधारे कृती कार्यक्रम संकल्पना स्पष्ट करतील.
- तिसऱ्या दिवशी 'कृती कार्यक्रम' प्रत्येक शिक्षकाने तयार करून त्याची एक प्रत सुलभकाकडे मूल्यांकनासाठी द्यायची आहे ही सूचना देतील.
- दुसऱ्या दिवशीच्या अखेरीस सुलभक कृती कार्यक्रमाबाबत चर्चा/शंका समाधान घेतील.

# ५. प्रशिक्षण सत्र कार्यपद्धती

## दिवस पहिला : सत्र क्रमांक १ : प्रशिक्षणाची गरज, उद्दिष्टे, स्वरूप व परिणामकारकता

**वेळ : १० ते ११.१० (७० मि.)**

**भाग १ :** पूर्वचाचणी (३० मिनिटे)
प्रश्नपत्रिका वाटणे : ५ मि., सोडवणे २० मि., संकलन ५ मि.

**भाग २ :** प्रशिक्षणाची गरज, उद्दिष्टे, स्वरूप व परिणामकारकता (४० मि.)

### कार्यपद्धती :

PPT च्या साहाय्याने सादरीकरण, चर्चा व स्पष्टीकरण.

१) **प्रास्ताविक :** आपण कुठे आहोत? (Slide No. 2) (५ मि.)

२) विद्यार्थ्यांच्या भाषेच्या संपादनासंदर्भात जिल्ह्याची सद्यस्थिती (Slide No. 3 to 6) (१० मि.)
(या Slides आपापल्या जिल्ह्याची भाषेच्या संदर्भातील सद्यस्थितीची आकडेवारी घेऊन तयार केलेल्या असतील.)
@ Slide No 3 - संकलित मूल्यमापन चाचणी २०१६-१७, १ व २ आपले राज्य, जिल्हा व तालुका
@ Slide No 4 - पायाभूत चाचणी २०१६ व २०१७, आपले राज्य, जिल्हा व तालुका
@ Slide No 5 - SLAS, राज्य व जिल्हा
@ Slide No 6 - ASER, वाचन – इ. ३ री ते ५ वी व इ. ६ वी ते ८ वी, राज्य व जिल्हा (८ स्तंभ)
एकेक Slide क्रमाने दाखवावी यावरून आपल्या जिल्ह्यातील मुलांच्या भाषेच्या संपादनाबाबत काय दिसून येते? असा प्रश्न उपस्थित करून प्रशिक्षणार्थ्यांना आपली निरीक्षणे नोंदवण्यास व निष्कर्ष काढण्यास प्रवृत्त करावे.

**अंतिम निष्कर्ष –**

प्रत्येक मूल शिकत आहे अशी परिस्थिती नाही. आपण प्रामाणिकपणे शिकवितो तरीही काही मुले मागे राहतात. म्हणून प्रशिक्षणाची गरज आहे.

पुढील मुद्दे (क्र. ३ ते ८) Slide च्या साहाय्याने चर्चा, प्रश्नोत्तराच्या माध्यमातून स्पष्ट करावेत.

३) प्रशिक्षणाची उद्दिष्टे : (Slide No. 7) (२ मि.)

४) वाचन, मूलभूत वाचन क्षमता व पायाभूत वाचन क्षमता : (Slide No. 8) (३ मि.)

५) परिणामासाठी प्रशिक्षण धोरणानुसार प्रशिक्षण नियोजन : (Slide No. 9) (५ मि.)

६) प्रशिक्षण परिणामकारकता दर्शक : (Slide No. 10) (५ मि.)

७) प्रशिक्षण परिणामकारकता पडताळणी : (Slide No. 11 to 14) (५ मि.)

८) प्रशिक्षण कार्यपद्धती : (Slide No. 15 to 17) (५ मि.)
(वेळापत्रकाच्या आधारे तीन/चार दिवसांचे नियोजन सांगावे)

◈◈◈

## दिवस पहिला : सत्र क्रमांक २ - समता ते वाचन क्षमता

**कार्यपद्धती :** **वेळ : ११.१० ते १२.२० (७० मि.)**

**१) माणूस, गरजा आणि शिकण्याची क्षमता : (प्रश्नोत्तरे, चर्चा)** (१० मि.)

आपण सारे शिक्षण व्यवस्थेत काम करणारी **माणसे** आहोत. शिक्षण व्यवस्था ही **माणसं** घडविणारी व्यवस्था आहे. आपण सगळेजण माणूस आहोत. माणूस म्हणून जगातल्या प्रत्येक व्यक्तीला असतात अशा गरजा कोणत्या आहेत? (आलेले प्रतिसाद फळ्यावर नोंदवावेत.) आता आपण याचे याचे वर्गीकरण करणार आहोत.

१) जैविक/मूलभूत गरजा : अन्न, पाणी, हवा, निवारा इ.

२) मानसिक/बौद्धिक : प्रेम, विश्वास, आनंद, आत्मसन्मान, आदर इ.

या गरजांच्या बाबतीत जगातील सर्व माणसे समान असतात. गरीब–श्रीमंत, काळे–गोरे, लहान–मोठे स्त्री–पुरुष/transgender

- दोन्ही प्रकारच्या गरजांमधील फरक काय?
- गरजा मनाच्या की शरीराच्या?
- मर्यादा किती? (उदा. अन्न खाण्याची गरज एका विशिष्ठ मर्यादेपर्यंतच असते. पोट भरल्यानंतर खाणे एका मर्यादेनंतर दु:खदायक होते. unlimited खाऊ शकत नाही.) तसे मानसिक बौद्धिक गरजांचे असते का?
- मानसिक गरजांची पूर्ती नाही झाली तर काय परिणाम होतो? (जिथे आपल्याला आदराने, सन्मानाने वागवले जात नाही, प्रेम, विश्वास मिळत नाही त्या ठिकाणी जायचे टाळतो.) मुलांचेही असेच होते.
- नवे शिकण्याची क्षमता ही जगातल्या प्रत्येक माणसाच्या मुलामध्ये असते. प्रतिकूल परिस्थितीत शिकून यशस्वी झालेली हजारो माणसे आहेत. म्हणजेच प्रत्येक मूल शिकू शकते.

**२) माझा आनंद – माझा हक्क – माझी उपयोगिता : (गटचर्चा, सादरीकरण, संकलन)** (१५ मि.)

(५ ते ६ व्यक्तींचा एक याप्रमाणे गट करावेत) गटात :

१) लहान असताना मला खूप आनंद झाला होता असा व खूप दु:ख झाले होते असा प्रत्येकी एक प्रसंग आठवा व गटात सांगा.

२) शिक्षक म्हणून काम करताना तुम्हाला सर्वांत अधिक आनंद झाला होता ते प्रसंग आठवा व गटात सांगा.

(गटात झालेल्या चर्चेचा सारांश गटातील एका प्रतिनिधीने एका मिनिटात सादर करावा.)

सुलभक सर्व सारांशाचे विश्लेषण करून निष्कर्ष काढतील. या सर्व प्रसंगातून आपल्याला हेच दिसून येते की :

१) आपल्यापैकी प्रत्येकाला प्रेम, आदर, आत्मसन्मान, विश्वास मिळाला की कोणत्याही वयात आनंद होतो. तो मिळाला नाही की दु:ख होते आणि ते कायमचे लक्षात राहते.

२) शिक्षक म्हणून आपला खरा आनंद आपली मुले शिकण्यात असतो. कारण त्यामुळे शिक्षक म्हणून आपली उपयोगिता सिद्ध होते. हेच आपले उपयोगिता मूल्य आहे.

**३) प्रत्येक शिक्षक शिकवू शकतो : (प्रश्न, व्हिडीओ, चर्चा)** (२० मि.)

आपण सगळेजण वर्गातील सर्व मुलांना शिकवीत असतो. मात्र काही मुले कितीही शिकविले तरी शिकत नाहीत. असे का होत असावे? (गैरहजेरी, गरिबी, पालकांची शिक्षणाबद्दल अनास्था, मुलांच्या क्षमता असे प्रतिसाद येतील.)

(**महत्त्वाचे :** प्रतिसाद म्हणून आलेली सर्व उत्तरे स्वीकारावीत त्यावर काहीही भाष्य करू नये.)

**व्हिडीओ क्लीप : ज्यामधून सर्व मुले शिकू शकतात. फक्त प्रत्येकाची गती व शिकण्याची पद्धती वेगळी असते असा संदेश देणारी, ३ ते ५ मिनिटांची असावी.**

तुम्ही सांगितलेली सर्व कारणे खरी आहेत मात्र या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी मूल शाळेत रमणे आवश्यक असते. त्यातही त्याला प्रेम, आनंद, आत्मसन्मान, आदर, विश्वास हे सर्व मिळायला हवे. अनेक शिक्षकांनी या सर्व समस्यांवर मात करून आपल्या वर्गातील सर्व मुले शिकती केली आहेत. असे आम्ही सर्वजण करू शकतोच त्यासाठी आपल्या वर्गातील प्रत्येक मुलाची मूलभूत वाचन क्षमता विकसित होणे आवश्यक आहे.

**४) वाचता येणे आणि शिकणे याचा परस्पर संबंध आहे का? कोणता?** (१५ मि.)

**(प्रशिक्षणार्थींचे प्रतिसाद स्वीकारून त्याचे संकलन करून पुढील मुद्दे मांडावेत.)**

चर्चेचा सारांश : शिकणे म्हणजे स्वत:ला व आपल्या आजूबाजूच्या जगाला समजून घेणे, यशस्वीरित्या जगण्यासाठी आपल्या प्रत्यक्ष अनुभवांच्या कक्षेच्या पलीकडचे जग समजून घ्यावे लागते. त्यासाठी वाचता येणे आवश्यक असते. वाचायला येत नसलेल्या मुलांना शिकण्यात गोडी वाटत नाही. अशी मुले अभ्यासात मागे राहतात. हीच परिस्थिती कायम राहिली तर शाळा सोडून देतात हे जगभरात झालेल्या संशोधनातून सिद्ध झाले आहे.

**५) मूलभूत वाचन संकल्पना : वाचन म्हणजे काय? (चर्चा) मूलभूत वाचन क्षमता व पायाभूत वाचन क्षमता** (१० मि.)

वाचन म्हणजे लिहिलेल्या किंवा छापलेल्या मजकुरातील अर्थ शोधण्याची प्रक्रिया. ही आयुष्यभर चालू असते. मात्र लिहिलेला किंवा छापलेला मजकूर काहीतरी अर्थ व्यक्त करण्यासाठी असतो हे मुलांना वाचन शिकण्याच्या पहिल्या पायरीपासूनच कळणे आवश्यक असते.

लिहिलेले शब्द ओळखणे आणि महत्त्वाची विरामचिन्हे लक्षात घेऊन उच्चारणे हा वाचन क्षमता विकासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. (इयत्ता दुसरीच्या अखेरीस) (पृष्ठ क्र. २ व ३ वरील मजकुरावर चर्चा)

◈◈◈

# दिवस पहिला : सत्र क्रमांक ३ : बहुभाषिक/मराठीपेक्षा भिन्न मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे भाषा शिक्षण

**कार्यपद्धती :** **वेळ : १२.३० ते १.४० (७० मि.)**

- **पूर्वतयारी :** गटकार्यासाठी द्यावयाच्या विषयाच्या चिठ्ठ्या तयार करून ठेवणे.
- **प्रास्ताविक : उद्दिष्ट –** भिन्न मातृभाषा असलेल्या मुलांना भाषा शिकविण्यासाठी वेगळा विचार करण्याची गरज स्पष्ट करणे. (प्रश्नोत्तरे, चर्चा) (५ मि.)
- **गटकार्य :** (२० मि.)

  सुलभक प्रशिक्षणार्थ्यांचे प्रत्येकी ५ प्रशिक्षणार्थीचा एक यानुसार गट करतील. प्रत्येक गटाला विषय लिहिलेली चिठ्ठी उचलून आपापला विषय निवडण्यास सांगतील. गटात बहुभाषिक विद्यार्थ्यांचे भाषा शिक्षण या लेखाचे वाचन करण्यास सांगतील व त्याआधारे निवडलेल्या विषयावर गटात चर्चा करून सादरीकरण करणेबाबत सूचना देतील.

  **सादरीकरणासाठी नियम**

  - आपापल्या विषयाच्या संदर्भात लेखातील मुद्द्यावर गटाने केलेला विचार सादरीकरणामध्ये यावा.
  - लेखातील मजकूर समजून घेऊन त्यात स्वत:ची भर घालावी.
  - सादरीकरण मुद्देसूद (शक्यतो Bullet points मध्ये) असावे.
  - वर्गासमोर सादरीकरण करण्यासाठी गटातील व्यक्तींची निवड चिठ्ठ्या टाकून केली जाईल त्यामुळे गटातील प्रत्येक व्यक्तीने सादरीकरणासाठी तयार राहावे.

  **सादरीकरणासाठी विषय :**

  - मराठीपेक्षा वेगळी मातृभाषा असलेल्या मुलांना शिकण्यात कोणत्या अडचणी येतात?
  - मराठीपेक्षा वेगळी मातृभाषा असलेल्या मुलांना शिकविताना शिक्षकांना कोणत्या अडचणी येतात?
  - बहुभाषिक विद्यार्थ्यांच्या भाषा शिक्षणावर झालेल्या संशोधनांचे निष्कर्ष कोणते? आपल्या राज्यातील परिस्थितीत हे निष्कर्ष लागू पडतात असे तुम्हाला वाटते का?
  - मुलांच्या मातृभाषेकडे पाहण्याचा आपला (शिक्षक म्हणून) दृष्टिकोन काय आहे? व तो कसा असावा असे आपल्याला वाटते?
  - शिक्षकांना मुलांची भाषा येणे आवश्यक आहे का? तुमच्या उत्तराचे समर्थन कसे कराल?
  - शिक्षकांनी मुलांची भाषा शिकण्याचे कोणते मार्ग तुम्हाला सोपे व सोयीस्कर वाटतात?
  - बहुभाषिक मुलांना वाचन शिकविताना कोणती तत्त्वे विचारात घेणे आवश्यक आहे? त्यासाठी शिक्षकांना कोणती पूर्वतयारी करावी लागेल व का ?
  - बहुभाषिक विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तकाचे व इतर अध्ययन साहित्याचे स्वरूप कसे असावे?

  (गटकार्य चालू असताना सुलभक प्रत्येक गटातील व्यक्तींच्या नावाच्या चिठ्ठ्या तयार करून ठेवतील.)

- **गटकार्य सादरीकरण व चर्चा :** (४० मि.)

  वेळ : प्रत्येक गटासाठी ३ मिनिटे सादरीकरण व २ मिनिटे चर्चा

  समारोप : सुलभक सर्व गटांच्या चर्चेचा सारांश सांगून समारोप करतील. (५ मि.)

**दिवस पहिला सत्र क्र. ४ पासून या घटकसंचात देण्यात आलेल्या सत्राची उद्दिष्टे ही विद्यार्थ्यांसाठीच आहेत. ही सर्व उद्दिष्टे साध्य करण्याची क्षमता शिक्षकांमध्ये येणे ही या प्रशिक्षणाची शिक्षकांसाठीची उद्दिष्टे आहेत.**

**सुलभकांसाठी सूचना –** १) कृतीसाठी गट तयार करताना एका गटात पाच ते सात प्रशिक्षणार्थींचा समावेश असावा.
२) कृतीनुसार गटातील सहभागी बदलावेत.
३) सत्राचे मूल्यमापन : सत्र संपल्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थ्यांना ते सत्र समजले का? याची पडताळणी CFU पद्धतीने (उदा. टाळी वाजवून, अंगठे दाखवून घ्यावी) प्रतिसाद देणे.

## दिवस पहिला : सत्र क्रमांक ४

**शिक्षणपूरक कृती १** **वेळ : २.३० ते ३.४० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. हस्तनेत्रसमन्वय साधता येणे. २. शरीराचा तोल सांभाळता येणे. ३. बैठक वाढविणे व एकाग्रता साधता येणे. ४. निर्णय क्षमतेत वाढ होणे. ५. समस्या निराकरण करता येणे. ६. ज्ञानेंद्रियांची क्षमता विकसित करणे. ७. अंदाज बांधता येणे. ८. सर्जनशीलता व जिज्ञासा निर्माण करणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **१. कागद फाडणे –**<br>१) प्रशिक्षणार्थींच्या मनाप्रमाणे<br>२) दोन बोटांनी फाडणे.<br>३) दोन बोटाने सरळ रेषेत फाडणे.<br>४) घडी घालून घडीवर फाडणे. | कागद | १) सुलभक वर्तमानपत्राचे एका पानाचे चार भाग करून प्रशिक्षणार्थींना देतील.<br>२) प्रत्येक भागाचा उपयोग करून क्रमांक १ ते ४ प्रमाणे एक–एक कृती करवून घेतील. या कृती करत असताना इतर सुलभक गटात मदत करतील. | १० मिनिटे | १) ऐकून कोणत्या कृती केल्या?<br>२) या कृतींचा क्रम कसा आहे?<br>३) या कृतींचा मुलांच्या शिकण्याशी काय संबंध आहे?<br>(१० मिनिटे)<br>**या कृतींनी हे घडेल**<br>मुलाची शाळेशी जवळीकता वाढवून मूल शाळेशी जोडणे.<br>• मुलाने शिकण्यातील आनंद घेणे.<br>• मुल शाळेत टिकणे. |
| **२. कागद चुरगळणे –**<br>१. दोन हाताने चुरगळणे.<br>२. एका हाताने चुरगळणे.<br>३. चेंडू तयार करणे.<br>४. एक हाताने फेकणे. दोन हाताने झेलणे. | कागद | १) अगोदर फाडलेल्या कागदांचा यासाठी वापर करतील.<br>२) क्रमांक १ ते ४ क्रमाने कृती करवून घेतील. या कृती करत असताना इतर सुलभक गटात मदत करतील. | १० मिनिटे | |
| **३. चिखलाचे गोळे तयार करणे.**<br>• प्रथम मातीपासून चिखल तयार करणे.<br>• बोटांचे सहाय्याने गोल करणे. | माती/तयार क्ले | १) सुलभक गट तयार करतील.<br>२) १ व २ प्रमाणे गटात कृती करून घेतील. | १० मिनिटे | |

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
| --- | --- | --- | --- | --- |
| **४. चालणे –**<br>१) सरळ रेषेवरून चालणे.<br>२) उलटे चालणे.<br>३) डोक्यावर वस्तू ठेवून चालणे.<br>४) प्राण्यांप्रमाणे चालणे.<br>५) अडथळे पार करत चालणे.<br>६) नागमोडी दोरीवरून गटाने चालणे इत्यादी. | जाड दोरी, पुस्तक / वही (अडथळे निर्मितीसाठी प्रशिक्षणस्थळी अथवा वर्गात असलेल्या साहित्याचा वापर करावा.) | १) सुलभक एका–एका गटाकडून कृतीत नमूद केल्याप्रमाणे कृती करून घेतील. | १० मिनिटे | १) परिसरातील खेळ का घ्यावेत?<br>२) या कृतीमुळे मुलांच्या शिकण्याची पूर्वतयारी कशी होते?<br>३) आपल्याला खेळताना काय वाटले?<br>४) हे खेळ खेळताना विचार प्रक्रिया कोणती घडली?<br>५) खेळताना आनंद का वाटतो?<br>५ मिनिटे |
| **५. उड्या, लोटांगण –**<br>१) बेडूक उडी , ससा उडी<br>२) कोलांटी उडी | | १) या कृती प्रशिक्षणार्थीकडून गटात करून घेतील. | ५ मिनिटे | हे खेळ खेळताना अंदाज घेणे. तर्क लावणे, निरीक्षण करणे, पडताळा घेणे, तुलना करणे, निष्कर्ष काढणे, निर्णय घेणे, कृती करणे, विश्लेषण करणे या तर्कशुद्ध विचार करण्याचे टप्पे मूल वापरत असते. |
| **६. खेळ –**<br>१) टायर फिरवणे<br>२) सागरगोट्या<br>३) काचकवड्या<br>४) जिबल्या<br>५) काचपुरणी<br>६) लगोरी<br>७) गोट्या<br>८) विटीदांडू<br>९) आंधळी कोशिंबीर इ.<br>*** टिप – यातील काही खेळ सुलभक घेतील.** | | सुलभक एका गटास एक खेळ देतील व इतर गटांना खेळणारा गट काय करतो आहे, कसे खेळतो आहे. त्याचे निरीक्षण करण्यास सांगतील. (याप्रमाणे परिसरातील खेळांची यादी तयार करून घेतील.) | १० मिनिटे | हे विवेचन सुलभकाने एखाद्या खेळाच्या नंतर सांगावे. |

## दिवस पहिला : सत्र क्रमांक ५

### शिक्षणपूरक कृती २

**वेळ : ३.५० ते ५.०० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. हस्तनेत्रसमन्वय. २. शरीराचा तोल सांभाळणे. ३. एकसंघ काम करता येणे. ४. बैठक व एकाग्रता येणे ५. निर्णय क्षमता वाढविणे ६. समस्या निवारण करणे. ७. ज्ञानेंद्रियांचा विकास करणे ८. अंदाज बांधता येणे ९. सृजनशीलता व जिज्ञासा निर्माण करणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **७. इतर कृती**<br>१) बाटलीचे टोपण लावणे.<br>२) बाटलीचे टोपण काढणे.<br>३) बाटलीत पाणी/माती भरणे. (कसेही, बोटाने)<br>४) भुईमुगाच्या शेंगा फोडणे.<br>५) डाळ तांदूळ निवडणे. | रिकाम्या बाटल्या, माती, पाणी, भूईमुगाच्या शेंगा, तांदूळ, डाळ | सुलभक कृतीत नमूद केल्याप्रमाणे कृती करून घेतील.<br>भुईमुगाच्या शेंगा प्रत्येक प्रशिक्षणार्थी–कडून बोटांच्या मदतीने फोडून घेतील, शेंगा दोन बोटांच्या चिमटीत धरून फोडून घेतील, बाटलीस टोपण लावून घेतील व काढून घेतील. | १५ मिनिटे | १) या कृती का घेतल्या असतील ?<br>२) या कृतीमुळे मुलाच्या पुढील शिक्षणाची तयारी कशी होत असेल ?<br>३) कोणती उद्दिष्टे या मधून साध्य होतील? (१० मिनिटे)<br><br>चव, वास, रंग, स्पर्श या सर्वांचे अनुभव मुलांना द्यावेत. त्यानंतरच ओळखण्याची कृती मुलांकडून करून घ्यावी. |
| • वास, चव, रंग, स्पर्श, ध्वनी यांचा अनुभव देणे. | वास डबी, चव डबी, रंगपट्ट्या, स्पर्श–पट्ट्या, ध्वनी डब्या, चित्रपट्ट्या | सुलभक रंग, स्पर्श, वास, ध्वनी यांचा अनुभव गटाला देतील. चव कशी आहे? आवाज कशाचा आहे ? यांसारखे प्रश्न विचारतील. | १० मिनिटे | |
| **८. जोड्या लावणे.**<br>रंग, आकार, स्पर्श, चव | | रंग, आकार, स्पर्श, चव या संदर्भाने माहीत असलेल्या वस्तूची यादी करून जोड्या लावून घेतील. | ५ मिनिटे | |
| • चित्रातील मार्ग शोधा | | सुलभक साहित्य गटात देतील, कृती करून घेतील. या कृतीवर चर्चा आयोजित करतील. | ५ मिनिटे | |
| **९. वर्गीकरण करणे**<br>**१०. आकृतिबंध** | रंगोमेट्री | सुलभक वर्गीकरण करणेबाबत प्रशिक्षणार्थींना सूचना देतील, रंगोमेट्रीच्या साहाय्याने प्रशिक्षणार्थी आकृतिबंध तयार करतील. | १० मिनिटे | वर्गीकरणासाठी कोणते निकष वापरले व का वापरले?, आकृतिबंधाचा संबंध शिक्षणात कोठे कोठे येतो?, आकृतिबंध परिसरात, अनुभवात कोठे कोठे दिसतात? (५ मिनिटे) |
| **११. आकृतिबंध ओळखणे**<br>(रंग,आकार,ताल,सूर,माप,अंक) | | आकृतिबंधाची विविध उदाहरणे देणे.<br>उदा. टाळीचा आकृतिबंध. | १० मिनिटे | |

# दिवस दुसरा : सत्र क्रमांक १

**श्रवण १** **वेळ : १०.०० ते ११.१० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. लक्षपूर्वक ऐकता येणे. २. ध्वनीतील सुक्ष्म भेद ओळखता येणे. ३. ध्वनीतील साम्य ओळखता येणे. ४. जाणीवपूर्वक ऐकण्याची सवय लावणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **१. डबीतील विविध वस्तूंचे ध्वनी ऐकविणे व ओळखणे.** | डब्या (साखर, तांदूळ, शेंगदाणे घुंगरू, साबुदाणा) | १) ध्वनी डब्यातील वस्तू दाखवतील व डबी बंद करून आवाज ऐकवतील.<br>२) प्रशिक्षणार्थींना डोळे बंद करून आवाज ऐकवतील व आवाज ओळखण्यास सांगतील. | १० मिनिटे | १) डबीतील व प्राणी पक्षी आवाजातील कृतींच्या क्रमामागील विचार काय असेल?<br>२) ध्वनी ऐकविण्याचा शिकण्याशी काय संबंध आहे?<br>३) गाणी, बडबडगीते निवडताना कोणती काळजी घ्यावी?<br>४) गोष्ट निवडताना काय काळजी घ्यायला हवी?<br>(१५ मिनिटे) |
| **२. प्राणी, पक्षी, वाहने इ. चे आवाज ऐकविणे व ओळखणे.** | चलभाष (मोबाईल) | २) मोबाईलच्या, संगणक इत्यादीच्या माध्यमातून प्राणी, पक्षी वाहने यांचे समूहात आवाज ऐकवतील.<br>सूचना – आरंभी परिसरातील प्राणी, पक्षी यांची आवाज ऐकवतील. | १५ मिनिटे | |
| **३. गाणी, बडबड गीते, संवाद.** | | १) कृतियुक्त गाणे म्हणतील व प्रशिक्षणार्थी – कडून इतर माध्यमाद्वारे गाणे ऐकवतील, दाखवतील. | १० मिनिटे | |
| **४. गोष्टी ऐकवणे, गोष्टी वाचून दाखवणे.** | संगणक प्रक्षेपक (प्रोजेक्टर) | १) एका गोष्टीचे आदर्श वाचन करतील.<br>२) दृकश्राव्य व श्राव्य माध्यमाद्वारे गोष्ट ऐकवतील व दाखवतील.<br>३) सुलभक एक गोष्टीचे पुस्तक दिसेल असे धरतील. पुस्तकातील मुखपृष्ठ, मलपृष्ठ, चित्रकार, लेखक, प्रकाशक, पुस्तकाचे नाव इत्यादी सांगतील. नंतर गोष्टीच्या पुस्तकाचे वाचन करून दाखवतील. | २० मिनिटे | आपण जे बोलतो त्या ध्वनीला एक चित्र (ध्वनीचिन्ह) असते. पुस्तकात जे लिहिलेले चित्र (अक्षर) असते. त्याला एक ध्वनी असतो. बडबड गीतांमध्ये ध्वनीची पुनरावृत्ती होणारी अक्षरे असतात. त्यामुळे ध्वनीचा योग्य उच्चार करण्याचा सराव होतो. |
| **५. सहभागी वाचन** | | | | |

# दिवस दुसरा : सत्र क्रमांक २

**श्रवण २** **वेळ : ११.१० ते १२.२० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. लक्षपूर्वक ऐकता येणे. २. ध्वनीतील साम्य-भेद ओळखता येणे. ३. जाणीवपूर्वक ऐकण्याची सवय लागणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| ६. **संवाद, नाटुकले ऐकवणे/वाचून दाखवणे.** (बोलीभाषेतील) | श्राव्यसाधने,<br>दृक-श्राव्यसाधने, वाचन साहित्य | १) सुलभक प्रशिक्षणार्थीकडून संवाद सादर करून घेतील. (संवादाचे विषय सुलभक देतील. तयारीसाठी पाच ते सात मिनिटे वेळ देतील.<br>२) दृकश्राव्य माध्यमांच्याद्वारे संवाद ऐकवतील, दाखवतील.<br>३) श्राव्य माध्यमाच्याद्वारे संवाद ऐकवतील. (संगणक, मोबाईल)<br>४) सुलभक संवाद वाचून दाखवतील. | २० मिनिटे | १) संवादाची निवड करतांना/ ऐकवताना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात? (१५ मिनिटे) |
| ७. **खेळ**<br>१) कानमंत्र, २) राजा म्हणतो<br>३) चिमणी भुर्रर...,<br>(यासारख्या परिसरातील खेळांची कृतीसह यादी असावी.)<br>४) गाणे वाढवत जाणे.<br>(उदा. सातार्‍याचा म्हातारा शेकोटीला आला इ.) | तीन प्रकारच्या सूचनांचे संच | सोबत दिलेल्या कृती क्रमाने घेण्यात याव्यात. | १५ मिनिटे | खेळाचे नियम,<br>सूचना फळ्यावर लिहिव्यात.<br>जे बोलतो ते लिहिले जाते. जे लिहिले जाते त्याप्रमाणे कृती करावयाची असते<br>ही समज वाढते. |
| ८. **सूचना**<br>१) एक कृती असणारी सूचना<br>२) दोन कृती असणारी सूचना<br>३) तीन कृती असणारी सूचना<br>(येथे बोलीभाषेतील सूचना असाव्यात.) | | ४) खेळ घेताना खेळाचे नियम फळ्यावर लिहिणे.- जे बोलतो ते लिहिले जाते. जे लिहिले जाते तशी कृती घडते. हे समजणे.<br>सुलभक प्रशिक्षणार्थीकडून खेळ खेळून घेतील. | २० मिनिटे | |

# दिवस दुसरा : सत्र क्रमांक ३

**भाषण संभाषण १** **वेळ : १२.३० ते ०१.४० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. अनौपचारिक/औपचारिक गप्पा मारता येणे. २. कृतीचे वर्णन करणे. ३. पूर्ण वाक्यात बोलता येणे. ४. मुद्देसूद बोलता येणे. ५. योग्य गतीने, योग्य आरोह–अवरोहासह बोलता येणे. ६. प्रश्न विचारता येणे. ७. संवाद साधता येणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **१. ओळख –** स्वतःची | | सुलभक स्वतःची ओळख करून देतील. जसे मी नामदेव. माझे नाव नामदेव आहे. | ५ मिनिटे | |
| **२. माहिती –** कुटुंब, मित्र, परिसर | | सुलभक एका गटातील प्रत्येकाकडून कुटुंबाची माहिती करून घेतील. या प्रमाणे मित्र, परिवार इत्यादींची माहिती घेण्यास सांगतील. | ५ मिनिटे | |
| **३. चित्रवर्णन, चित्रगप्पा, चित्रवाचन**<br>१) चित्राचे नाव सांगणे.<br>२) चित्रातील कृती सांगणे.<br>३) चित्रवर्णन.<br>४) चित्रगप्पा. | चित्रसंच क्र. म/०२/०१ ते म/०२/२२, म/०३/०१ ते म/०३/१५ | १) एक वस्तू/पक्षी/प्राण्याचे चित्र दाखवून हे चित्र कशाचे आहे हे सुलभक विचारतील.<br>२) कृती करत असलेले चित्र दाखवून चित्रातील व्यक्ती काय करीत आहेत असे विचारतील.<br>३) विविधता असलेले चित्र दाखवून प्रशिक्षणार्थीकडून प्रथम चित्राचे वर्णन करून घेतील.<br>• वरील कृती सामूहिक, गटात व वैयक्तिक घेण्यात येतील.<br>• चित्रगप्पा– सुलभक विविधता असलेले मोठे चित्र समूहात/गटात दाखवतील. या चित्रात मुले काय करत असतील. आनंदाने काय करीत असतील अशा प्रकारचे प्रश्न विचारून गप्पा मारतील. | २५ मिनिटे | १) चित्रवर्णन, चित्रगप्पा व चित्रवाचन यात काय फरक आहे?<br>२) दिलेला क्रम असा का आहे?<br>३) चित्रवर्णन व चित्रगप्पा या दोन्ही कृतीत मुलांना विचारायच्या प्रश्नात कोणता फरक कराल? |

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| | | • वरील कृती सामूहिक, गटात व वैयक्तिक घेण्यात येईल.<br>• सुलभक गटात चित्रमालिकांचा संच देतील.<br>• चित्र क्रमाने लावून प्रशिक्षणार्थी गोष्ट सांगतील.<br>(या कृतीसाठी या पूर्वी ऐकविलेल्या गोष्टीच्या चित्र मालिकेचा संच द्यावा. | | |
| **४. गप्पा**<br>**१) अनौपचारिक गप्पा –**<br>विषय ठरलेला नसतो, सहज मारलेल्या गप्पा<br>**२) औपचारिक गप्पा –**<br>विषय – ठरवलेला असतो, त्यास अनुसरून गप्पा होतात.<br>(गप्पांचे विषय मुलांच्या अनुभव विश्वातले.) | परिचयाच्या वस्तू | १) सुलभक वर्गातील प्रशिक्षणार्थींना वस्तू दाखवून गप्पा घडवून आणतील.<br>उदा. दगड या विषयावर बोला.<br>**महत्त्वाचे –** ठरवून गप्पा मारताना शिक्षकांनी वर्गीकरण/विभाग होतील असे प्रश्न विचारून गप्पांना दिशा द्यावी. उदा. दगडाचा आकार व दगडाचे उपयोग. | ५ मिनिटे | १) औपचारिक व अनौपचारिक गप्पांमधील फरक काय?<br>वर्षभरांच्या गप्पांचे नियोजन कसे करता येईल?<br>(१० मिनिटे) |
| **५. संवाद, नाटुकली तयार करणे, प्रश्न विचारणे, मत व्यक्त करणे.** | | १) श्रवणामध्ये झालेल्या संवादावर सुलभक प्रशिक्षणार्थीकडून नाटुकले तयार करून घेतील.<br>२) सादरीकरणावर चर्चा घडवून आणतील, मत विचारतील.<br>३) एखादी वस्तू दाखवून त्यावर प्रश्न विचारायला सांगतील. एकमेकांना प्रश्न न विचारता गप्पा मारा, ही कृती घ्यावी. (नाटुकले विद्यार्थ्यांनी लिहिणे अपेक्षित नाही.) | २० मिनिटे | |

# दिवस दुसरा : सत्र क्रमांक ४

## भाषण संभाषण २

**वेळ : २.३० ते ३.४० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. अनौपचारिक/औपचारिक गप्पा मारता येणे. २. कृतीचे वर्णन करणे. ३. पूर्ण वाक्यात बोलता येणे. ४. मुद्देसूद बोलता येणे. ५. योग्य गतीने, योग्य आरोह–अवरोहासह बोलता येणे. ६. प्रश्न विचारता येणे. ७. संवाद साधता येणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| ६. **घटनाक्रम सांगणे** | कार्ड क्र. म/०८/०१/०१ ते म/०८/१०/०४. | १) सुलभक प्रशिक्षणार्थ्यांकडून घटनाक्रम तयार करून घेतील. उदा. चहा तयार करणे, भाकरी करणे, शाळेत येणे (सुरुवातीला अनुभव विश्वाशी संबंधित विषयाशी घटनाक्रम असावेत.)<br>२) वरील कृतीवर सुलभक चर्चा घडवून आणतील.<br>घटनाक्रमांची यादी करून एक घटनाक्रम लिहून घेतील. | १५ मिनिटे | १) घटनाक्रमाची कृती वर्गात कोणकोणत्या पद्धतीने घेता येईल? |
| ७. **गोष्टी**<br>१) ऐकलेली गोष्ट सांगता येणे.<br>२) अपूर्ण गोष्ट/ प्रसंग पूर्ण करणे. | बोलीभाषेतील गोष्टी व चित्रमालिका | १) प्रशिक्षणार्थीकडून ऐकलेली गोष्ट सांगण्यास सांगतील.<br>२) सुलभक अपरिचित गोष्ट अर्धी सांगतील. उर्वरीत गोष्ट प्रशिक्षणार्थींना पूर्ण करण्यास सांगतील. | १५ मिनिटे | १) घटनाक्रम कृतीमुळे मुलांच्या शिक्षणांत काय मदत होते? |
| ८. **कृतियुक्त गाणी**<br>१) पारंपरिक – ओव्या, भजन, अभंग, हादगा, मंगळागौर, भुलाबाई, इ.<br>२) परिसरातील कृतियुक्त गाणी. | परिसरातील लोकगीते (बोलीभाषेतील) | १) सुलभक सहभागींकडून कृतियुक्त गाणी, ओव्या, भजन इत्यादी सादरीकरण घेतील. | १० मिनिटे | **श्रवण व भाषण संभाषण या कृती वर्गात एकमेकात मिसळणाऱ्या आहेत कां? कशा?**<br>**महत्त्वाचे :** गाण्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणांशी शाळा जोडली जाते. यासाठी समाजातील घटकांचा सहभाग घेता येईल. |

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **९. खेळ**<br>१) वन मिनिट शो (चित्रातील विषयावर बोलावे. विषय मुलाला परिचित असावेत.)<br>२) शब्दभेंड्या, अक्षरभेद, ध्वनीभेद<br>३) हुमान (कोडी)<br>४) दिलेल्या शब्दावर वाक्य सांगणे.<br>५) थीमच्या संदर्भातील शब्द लिहिणे. | | १) सुलभक चित्र दाखवतील. एका प्रशिक्षणार्थीस एक मिनिट बोलण्यास सांगतील. उदा. – आंब्याचे चित्र आल्यास आंब्यासंबंधी बोलणे अपेक्षित आहे.<br>२) एक शब्द देऊन त्यातील शेवटच्या अक्षरांपासून नवीन शब्द बनवून घेणे. याप्रमाणे पुढे वाढवित जाणे.<br>३) सुलभक प्रत्येक गटास एक हुमान सांगण्यास सांगतील.<br>४) दिलेल्या शब्दावर वाक्य सांगण्यास सांगतील.<br>५) प्रत्येक गटास एक एक चित्र देतील व त्यांच्याशी संबंधित शब्द सांगण्यास सांगतील. प्रशिक्षणार्थ्यांनी सांगितलेले शब्द फळ्यावर लिहितील. | १५ मिनिटे | १) या कृती का घेतल्या असतील?<br>२) या कृतींचा मुलाच्या शिकण्याशी काय संबंध आहे?<br>३) या कृती मालिकेतून कोणती उद्दिष्टे साध्य होतात?<br>(१५ मिनिटे ) |

# दिवस दुसरा : सत्र क्रमांक ५

**वाचन भाग १** **वेळ : ३.५० ते ५.०० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. स्वर व व्यंजन वाचता येणे. २. शब्द वाचता येणे. ३. वाक्य वाचता येणे. ४. विरामचिन्हासह वाक्य वाचता येणे. ५. वाक्यात वापरलेल्या विरामचिन्हांचा अर्थ समजणे. ६. एकाच दृष्टीक्षेपात वाक्य वाचता येणे. ७. स्वराघातासह योग्य गतीने वाचन करता येणे. ८. वाचनाची आवड निर्माण करणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **१. चित्रवाचन**<br>१) एका वस्तूच्या चित्रांचे वाचन.<br>२) कृतीच्या चित्रांचे वाचन.<br>३) चित्रातील भावनांचे वाचन. | कार्ड क्र. म/२४/०१ ते म/२४/१० | १) कृतीमध्ये दिलेल्या क्रमाने सुलभक चित्रवाचन करून घेतील. | १० मिनिटे | चित्रवाचन हा वाचनातील महत्वाचा भाग आहे. चित्र वाचनाबाबतच्या या कृती कोणत्या टप्प्यावर घेण्यात आल्या आहेत? (१० मिनिटे)<br>**उद्देशानुसार चर्चा करावी.** |
| **२. मॅचिंग सेट**<br>१) सारखी चित्रे एकमेकावर ठेवणे. | समान असणारी चित्रे उदा. प्राणी, पक्षी, भांडी<br>कार्ड क्र. म/१/१/१ ते म/१/२/९० | १) चित्रतक्ता व तशाच प्रकारची सुटी चित्रे, चित्रतक्यावरील चित्रावर त्याच प्रकारची चित्रे जुळविण्याची कृती प्रशिक्षणार्थ्यांकडून करून घेतील.<br>२) **प्रशिक्षणार्थी** गटातून मॅचिंग सेट जोडून दाखवतील. संच जुळवतील. | ५ मिनिटे | |
| **३. चित्रगाडी** | चित्रगाडी संच.<br>कार्ड क्र. म/१२/०१/०१ ते म/१२/०५/०५ | १) चित्र गाडीचा आरंभ बाणाने व शेवट स्माईलीने होतो हे सांगतील. | ५ मिनिटे | |
| **४. चित्रयुक्त दिशादर्शक पट्टी** | कार्ड क्र. म/०६/०१ ते म/०६/१० | १) सुलभक चित्रयुक्त दिशादर्शक पट्टया प्रत्येक गटात देतील पटटी घेऊन डावीकडून उजवीकडे रेषेवरून बोट फिरवून चित्रानुसार वाचन करतील. उदा. सिंह अशा या मार्गाने गुहेत जातो. | ५ मिनिटे | |
| **५. पट्टीवरील चित्रवाचन**<br>(डावीकडून उजवीकडे वाचन) | चित्रपट्टी, कार्ड क्र. म/०६/०१ ते म/०६/१० | १) वरील प्रमाणे डावीकडून उजवीकडे प्रशिक्षणार्थी चित्र वाचन करतील. | ५ मिनिटे | |

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **६. चित्रातील वेगळा ओळखा.** | चित्रकार्ड कार्ड क्र. म/०९/०१/०१ ते म/०९/०२/२० | १) सुलभक एका गटाला एक सारखी अनेक चित्र व एक वेगळे चित्र देऊन प्रशिक्षणार्थीला ओळखण्यास सांगतील. | ५ मिनिटे | १. चित्रातील वेगळा व साम्य भेद ओळखा– या कृती करताना मुलांमध्ये कोणत्या मानसिक क्रिया घडतील? <br>२. या सर्व कृतींचा वाचनाशी कसा संबंध जोडता येईल? <br>३. सुसंगतपणे वाक्य जोडणी करता येते का? <br>(५ मिनिटे) |
| **७. चित्र साम्य–भेद ओळखा.** | चित्रकार्ड कार्ड क्र. म/०४/०१ ते म/०४/०१२ | १) सुलभक प्रत्येक गटाला दोन सारखी चित्रे देऊन त्यातील साम्य ओळखण्यास सांगतील. <br>२) सुलभक सादरीकरण एकेका गटाकडून करून घेतील | ५ मिनिटे | |
| **८. समान अक्षरांच्या जोड्या लावणे.** | अक्षरकार्ड क्र. म/१८/०१ ते म/१८/५१ | १) समान अक्षरांच्या, चित्रांच्या गटानुसार जोड्या लावण्यास सांगतील. | ५ मिनिटे | |
| **९. अक्षरांची गाडी जोडणे.** | अक्षरकार्ड गाडी संच अक्षरकार्ड | १) अक्षरकार्ड घेऊन त्यानुसार सारखी अक्षरकार्ड जोडून गाडी तयार करून घेतील. | ५ मिनिटे | |
| **१०. अक्षरातील वेगळा ओळखा.** | अक्षरकार्ड कार्ड क्र. म/१८/०१ ते म/१८/११ | १) सारख्या दिसणाऱ्या अक्षर कार्डामधून वेगळे अक्षर ओळखण्यास सांगतील. | ५ मिनिटे | |

# दिवस तिसरा : सत्र क्रमांक १

**वाचन भाग २** **वेळ : १०.०० ते ११.१० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. स्वर व व्यंजन वाचता येणे. २. शब्द वाचता येणे. ३. वाक्य वाचता येणे. ४. विरामचिन्हासह वाक्य वाचता येणे. ५. वाक्यात वापरलेल्या विरामचिन्हांचा अर्थ समजणे. ६. एकाच दृष्टीक्षेपात वाक्य वाचता येणे. ७. स्वराघातासह योग्य गतीने वाचन करता येणे. ८. वाचनाची आवड निर्माण करणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **११. उपस्थितीपत्रक** | प्रत्येकाचे उपस्थितीपत्रक कार्ड. | १) सुलभक उपस्थिती पत्रकाची कृती कशी घ्यायची याची वर्गात चर्चा करतील वर्गात आल्यावर स्वतःचे उपस्थिती कार्ड घेऊन उपस्थिती लावतील. | ५ मिनिटे | १. तुमच्या मते उपस्थिती पत्रकाद्वारे काय साध्य होईल असे वाटते?<br>२. चित्रशब्दकार्ड वाचनातून आणखी काय साध्य होऊ शकते?<br>३. शब्दचक्र तयार करताना – गोष्टी, चित्रवाचन, गप्पा, संवाद, श्रवणातील कृती याचा काही संबंध आहे का? असल्यास कसा?<br>(१० मिनिटे ) |
| **१२. चित्रशब्दकार्ड वाचन** | चित्रशब्दकार्ड संच कार्ड क्र. म/११/०१ ते म/११/१०० | सुलभक एक संच घेऊन समूहात प्रशिक्षणार्थ्यांच्या मदतीने कृती करून दाखवतील.<br>१) चित्र शब्दांची पाच चित्रे समोर ठेवतील.<br>२) चित्रांवर बोट ठेवून चित्राचे वाचन करतील. उदा–वाघ,कोल्हा इत्यादी<br>३) चित्रावर त्याच सारखे सुट्टे चित्र घेऊन ठेवतील. शब्दावर तसाच सुटा शब्द घेऊन त्यावर ठेवतील.<br>४) सुटे शब्दपट्ट्या घेऊन वाचतील. कोल्हा, बैल, घोडा.. | १५ मिनिटे | |
| **१३. शब्दचक्रे**<br>**(अक्षरगट तयार करून घेणे)**<br>– शब्दामधील अक्षराला गोल करणे.<br>– शब्दावरून वाक्ये तयार करणे.<br>– शब्दाचक्रातील शब्दावरून माहिती तयार करणे. | अक्षरकार्ड– मुलांनी सांगितलेले शब्दकार्ड | १) सुलभक फळ्यावर एक अक्षर लिहितील. उदा. 'म' अक्षराभोवती गोल करतील.<br>२) अक्षराच्या ध्वनीची ओळख करून देतील. उदा–'म'<br>३) प्रशिक्षणार्थ्यांना 'म' ने सुरू होणारे शब्द विचारतील. | २५ मिनिटे | |

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| | | ४) सांगितलेले शब्द 'म' या अक्षराभोवती लिहितील. लिहिलेल्या शब्दांचे प्रशिक्षणार्थ्यांकडून वाचन करून घेतील.<br>५) लिहिलेल्या शब्दातील 'म' हा ध्वनी येणाऱ्या अक्षराभोवती गोल करण्यास सांगतील.<br>६) त्यातील एका शब्दावर प्रशिक्षणार्थ्यांना वाक्य सांगण्यास सांगतील.<br>७) सांगितलेली वाक्ये फळ्यावर लिहितील. वर्गात मुलांबरोबर ही कृती घेताना.<br>• फळ्यावरील वाक्य मुलांकडून वाचून घ्यावीत.<br>• वाचता न आल्यास शिक्षकांनी सांगावीत.<br>• मुलांनी सांगितलेले शब्द जसेच्या तसे लिहावे.<br>• आपल्याला हवा तो ध्वनी शब्दात नसल्यास फळ्यावर बाजूला लिहावा व तो बाजूला का लिहिला याची चर्चा करावी.<br>• अक्षर गटाप्रमाणे शब्दचक्रातील अक्षरांचा सराव करावा.<br>मुलाने स्वतःच सांगितलेले शब्द असल्यामुळे स्वतःचा शब्द वाचेल, मुलाने शब्द वाचायलाच पाहिजे असा आग्रह नको. | | |
| **१४. चित्रवाक्यसाचे** | चित्रवाक्यसाचे कार्ड क्र. म/१३/१/१ ते म/१३/२/२० | १. वाक्यसाचे देऊन वाक्य तयार करून घेतील. प्रशिक्षणार्थी शब्द वाक्यसाच्यांचे वाचन करतील.<br>**हा, ही, हे/तो, ती, ते याप्रमाणे वाक्यांचा सराव घ्यावा.** | ५ मिनिटे | १. चित्रवाक्यसाचे उपयोजन केल्याने वाचन कौशल्याला कशी मदत होईल?<br>२. शब्दवाक्यसाचे व चित्रवाक्यसाचे यांचे उपयोजन वर्गात केले गेल्यास काय परिणाम साध्य होतील.(१० मिनिटे ) |

# दिवस तिसरा : सत्र क्रमांक २

**वाचन भाग ३** **वेळ : ११.१० ते १२.२० (७० मि.)**

**सत्राची उद्दिष्टे :** १. स्वर व व्यंजन वाचता येणे. २. शब्द वाचता येणे. ३. वाक्य वाचता येणे. ४. विरामचिन्हासह वाक्य वाचता येणे. ५. वाक्यात वापरलेल्या विरामचिन्हांचा अर्थ समजणे. ६. एकाच दृष्टीक्षेपात वाक्य वाचता येणे. ७. स्वराघातासह योग्य गतीने वाचन करता येणे. ८. वाचनाची आवड निर्माण करणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **१५. अक्षरगटावर वाचनपाठ तयार करणे.**<br>– सहा अक्षरगटाचे वाचनपाठ तयार करणे. | चित्रकार्ड<br>कार्ड क्र.<br>म/१६/०१ ते<br>म/१६/०६ | १. आरंभी क, ख, ग, घ, च व ।(काना) यावर प्रशिक्षणार्थींना सुलभक शब्द बनवण्यास सांगतील व शब्दापासून वाक्य तयार करण्यास सांगून त्यावर वाचन पाठ तयार करण्यास सांगतील.<br>२. क, म, र, ब, घ ( काना ) यावर सुलभक प्रक्षिणार्थींना शब्द, वाक्य, वाचनपाठ तयार करण्यास सांगतील. दोन्ही कृतींवर चर्चा करतील. अक्षरगट का तयार करावेत यावर चर्चा करतील. याप्रमाणे दोन अक्षरगटावर प्रशिक्षाणार्थीकडून काम करून घेतील.<br>• (प्रशिक्षणार्थींना सर्व अक्षरगट देऊन चर्चा व गटकार्य करून घेतील) | १५ मिनिटे | वाचनपाठ कोणी तयार करावेत व का?<br>वाचनपाठातील शब्द निवडताना कोणती काळजी घ्यावी? |
| **१६. मुळाक्षरे वाचन** | मुळाक्षरे तक्ता<br>कार्ड क्र.<br>म/१७/०१ | १) सुलभक प्रशिक्षणार्थींना वर्गात मुळाक्षर तक्ता उपलब्ध करून देतील.<br>२) समूहासमोर मुळाक्षरांचे वाचन करतील प्रशिक्षणार्थींकडून वाचन करून घेतील.<br>३) सुलभक घेतलेल्या वाचनास प्रतिसाद देत सामूहिक वाचन घेतील. | ५ मिनिटे | १) मुळाक्षर वाचनाचा पुढे काय फायदा होतो? |

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **१७. चौदाखडी वाचन** | चौदाखडी वाचनकार्ड क्र. म/१९/०१ ते म/१९/०२ | १) सुलभक चौदाखडीचा तक्ता गटात वाटप करतील.<br>२) सामूहिक वाचन घेतील.<br>३) प्रशिक्षणार्थी चौदाखडी तक्त्यानुसार वाचन करतील.<br>४) ‘ऋ’ व ‘लृ’ चे शब्द प्रशिक्षणार्थ्यांना सांगण्यास सांगतील. ते शब्द फळ्यावर लिहितील व चर्चा घडवून आणतील. | ५ मिनिटे | २) बाराखडीमध्ये नवीन दोन स्वरांचा समावेश केला आहे त्या बद्दल तुमचे मत काय आहे?<br>३) या कृतीचा उपयोग कशासाठी होईल? (१० मिनिटे) |
| **१८. वर्णानुक्रम शब्द लावणे.** | सर्व वर्णाक्षरांची शब्द कार्ड,चित्रमय उतारे कार्ड उदा. सचिन खेळतो. कार्ड क्र. म/२०/०१ ते म/२०/२५ | १) सुलभक सर्व वर्णाक्षरांची शब्दकार्ड प्रशिक्षणार्थ्यास देतील.<br>२) त्या शब्दाचे वर्णानुक्रमानुसार शब्द लावून घेतील.<br>३) प्रशिक्षणार्थी एकमेकांबरोबर काम करतील, वर्णानुक्रमे शब्द कार्ड लावतील.<br>४) प्रशिक्षणार्थी ते शब्द वर्णानुक्रमे लावतील. | १० मिनिटे | वर्णानुक्रमे शब्द लावण्याच्या कृतीमुळे विद्यार्थ्यांचे कोणते कौशल्य विकसित होते? (५ मिनिटे) |
| **१९. जोडाक्षर वाचन** | क्य, र्क, ऱ्या, कृ, क्र हे जोडाक्षरयुक्त शब्दकार्ड<br>कार्ड क्र. म/२७/०१ ते म/२७/१२ | १) शब्दकार्डाच्या साहाय्याने पुढीलप्रमाणे कृती घेता येतील.<br>२) सुलभकांनी गटात १० ते १५ कार्ड द्यावीत व प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या कल्पनेनुसार कार्डाचे गट करण्यास सांगावे.<br>३) तयार झालेल्या कार्डाच्या गटावर चर्चा करून घ्यावी.<br>४) याशिवाय विशिष्ट प्रकारची जोडाक्षरे असणाऱ्या शब्द कार्डाचे गट करून घ्यावेत. उदा. व्या, प्र, इत्यादी | १५ मिनिटे | जोडाक्षरांचे गट करण्याच्या कृतीतून काय साध्य होईल? (५ मिनिटे) |

## दिवस तिसरा : सत्र क्रमांक ३

**वाचन भाग ४** **वेळ : १२.३० ते १.४० (७० मि.)**

**सत्राची उद्‌दिष्टे :** १. स्वर व व्यंजन वाचता येणे. २. शब्द वाचता येणे. ३. वाक्य वाचता येणे. ४. विरामचिन्हासह वाक्य वाचता येणे. ५. वाक्यात वापरलेल्या विरामचिन्हांचा अर्थ समजणे. ६. एकाच दृष्टीक्षेपात वाक्य वाचता येणे. ७. स्वराघातासह योग्य गतीने वाचन करता येणे. ८. वाचनाची आवड निर्माण करणे.

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| **२०. चित्रमय उतारे** | चित्रमय उतारे कार्ड क्र. म/२३/०१ ते म/२३/०९ | यामध्ये शब्द व चित्र यांचा संदर्भ जोडून वाक्य तयार करून वाचायचे आहे. याप्रमाणे चित्रमय उताऱ्यांचे वाचन करायचे आहे.<br>१) सुलभकांनी आरंभी प्रशिक्षणार्थ्यांच्या मदतीने एका कार्डाचे समूहात वाचन घ्यावे. नतंर गटात वाचन घ्यावे व शेवटी प्रशिक्षणार्थ्यांना वाचन द्यावे.<br>२) ही कृती समूहात वैयक्तिक करून घ्यावी. | १५ मिनिटे | १) तुम्ही चित्रमय उतारे कशा पद्धतीने तयार कराल?<br>(५ मिनिटे) |
| **२१. शब्द डोंगर** | शब्दकार्ड कार्ड क्र. म/२८/०१ ते म/२८/०२ | १) शिक्षक वर्गात फलकावर एक शब्द देतील उदा. आई. त्याच शब्दात आणखी एक–एक शब्द वाढवत वाक्य तयार करण्यास लावतील.<br>उदा. **आई/माझी आई/**<br>**ही माझी आई**.<br>२) प्रशिक्षणार्थी वर्गात एकमेकांशी चर्चा करतील. कोणता शब्द सांगावा व कोणता नको हा विचार करतील. निश्चित केलेले शब्द सांगतील. शब्द डोंगर तयार करतील. | २० मिनिटे | १) शब्दडोंगर तयार करतांना कोणत्या मानसिक प्रक्रिया घडतात?<br>२) प्रकट वाचनाचा सराव कसा घ्याल? आदर्श प्रकट वाचन कोणत्या निकषाचे आधारे ठरवाल?<br>(१० मिनिटे) |

| कृती | साहित्य | कार्यपद्धती | वेळ | चर्चेसाठी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| २२. **आदर्श प्रकट वाचन.** | विरामचिन्ह विरहित व विरामचिन्हांसह उतारे कार्ड गोष्टींची पुस्तके कार्ड क्र. म/३१/०१ ते म/३१/०५ | १) सुलभक पुस्तकांचे वाचन करतील. (आरोह अवरोह, स्वराघातासह ) | २० मिनिटे | |

## दिवस तिसरा : सत्र क्रमांक ४

**कृती कार्यक्रम** **वेळ : २.३० ते ३.४० (७० मि.)**

**कार्यपद्धती :** १. सुलभक प्रत्येक शिक्षकाकडून त्यांच्या वर्गात मूलभूत वाचन क्षमतेत मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नमुना (किमान ३ विद्यार्थ्यांसाठी) 'कृती कार्यक्रम' तयार करून घेतील. त्याची एक प्रत सुलभक स्वतःकडे घेतील. दिलेल्या निकषांच्या आधारे मूल्यांकन करून प्रत्येकास १० पैकी गुणदान करतील.

२. वेळेच्या उपलब्धतेनुसार काही 'कृती कार्यक्रमांचे' सादरीकरण घेतील.

# ६. कृती कार्यक्रम आराखडा

**संकल्पना :**

आपण कोणतेही काम करायचे ठरवले की त्याच्या नियोजनाची प्रक्रिया सुरू होते. आपणही आपल्या रोजच्या कामाचे नियोजन करीत असतो. उपलब्ध वेळेत कोणती कामे कधी करावीत, कोणता विषय, कोणता पाठ कधी घ्यावा इत्यादी. परंतु समता या विषयाची माहिती घेताना आपल्या लक्षात आलेच आहे की जेवायला बसवलं म्हणून सगळ्यांना सारख्याच भाकरी वाढणे उपयोगाचे नाही, ज्याची जेवढी गरज आणि भूक आहे तेवढेच त्याला द्यायला हवे. आपल्या वर्गातील कोणती मुले मूलभूत वाचन क्षमतेत मागे आहेत हे आपण जाणून असतोच. परंतु ती नेमकी वाचनाच्या कोणत्या टप्प्यावर आहेत आणि त्यांना पुढे कसे न्यायचे आहे, ती वाचती कशी होतील हे समजून व नियोजन करून करायचे काम आहे. हे काम करणे म्हणजेच कृती कार्यक्रम आराखडा करणे होय. कृती कार्यक्रम आराखड्याविषयी पुढील प्रश्नोत्तरातून अधिक माहिती घेऊ या.

### १) कृती कार्यक्रम आराखडा तयार करण्याची गरज काय?

– आत्तापर्यंत वाचता येणारी व न वाचता येणारी मुले (जोडाक्षरे/साधे शब्द/मुळाक्षरे इ. वाचता न येणारी) असेच ढोबळ मानाने विद्यार्थ्यांचे वर्गीकरण करत होतो. परंतु न वाचणारी मुले मूलभूत वाचनाच्या कोणत्या टप्प्यावर आहेत हे समजणे व त्यापुढे त्यांना कसे नेता येईल याची (प्रशिक्षणातून मिळालेली) दिशा व कालावधी निश्चित करता येणे, ठरावीक कालावधीनंतर मूल कोणत्या स्तरावर आहे, त्याने वाचनासाठी कोणते टप्पे पार केले आहेत हे समजणे, यासाठी कृती कार्यक्रम आराखडा तयार करणे गरजेचे आहे.

### २) कृती कार्यक्रम आराखडा कोणी करावा?

– इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गातील ज्यांचे विद्यार्थी मूलभूत वाचन क्षमता गाठू शकलेले नाहीत त्या प्रत्येक शिक्षकाने हा आराखडा तयार करावा.

### ३) कृती कार्यक्रम आराखड्यात कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा?

– कृती कार्यक्रम आराखड्यात गरज लक्षात घेताना आपणास पुढील बाबींचा समावेश करता येईल :

- मूलभूत वाचन क्षमता गाठू न शकलेल्या विद्यार्थ्याचे नाव, इयत्ता, तुकडी.
- विद्यार्थ्याला मूलभूत वाचन क्षमता प्राप्त होण्याचा कालावधी दिवसांत नमूद केलेला असावा. उदा. ४२ दिवस, ५७ दिवस इ.
- विद्यार्थ्याची मूलभूत वाचनाची सद्यस्थिती म्हणजे तो मूलभूत वाचनाच्या कोणत्या टप्प्यावर आहे हे स्पष्ट स्वरूपात नमूद केलेले असावे.
- सद्यस्थितीला कारणीभूत असणारे घटक/पार्श्वभूमी माहिती नमूद केलेली असावी. उदा. अनियमित शाळेत येण्याची कारणे काय, बोली भाषा वेगळी असल्याने योग्य श्रवण अनुभव न मिळाल्यामुळे इ.
- त्याला द्यावयाचे अध्ययन–अनुभव व त्याचा क्रम (शालापूर्व तयारी : श्रवण, भाषण–संभाषण, वाचन) निश्चित केलेला असावा. (त्यासाठी कृती नियोजन पुस्तिकेचाच आधार घ्यावा.)
- प्रत्येक अध्ययन अनुभवाला किती व कोणता कालावधी द्यावा हे निश्चित केलेले असावे.
- कोणते अनुभव एकामागोमाग वा एकसलग घेता येईल याचे नियोजन केलेले असावे. उदा. श्रवणाच्या कृती एकामागोमाग सुरू असताना भाषण संभाषण, वाचन इ.च्या कोणत्या कृती घेता येतील याची निश्चिती करणे.

- अध्ययन–अनुभव देण्यासाठी कोणते साहित्य वापरावे, जर हे साहित्य अध्ययन समृद्धी संचातील असेल तर त्याचा क्रमांक नमूद केलेला असावा. यातील सर्वच कृती शिक्षकांनी स्वत: घेण्याची आवश्यकता नाही. काही कृती वर्गातील इतर विद्यार्थीही घेऊ शकतील जेणेकरून त्यांना सरावातून आनंद मिळेल, त्यामुळे कृती घेताना सुलभक असतील की विद्यार्थी (नावासह) याची नोंद असावी. (कृती कार्यक्रम आराखड्याचा नमुना दिलेला आहे.)

**४) एका शिक्षकाने किती कृती कार्यक्रम आराखडे तयार करावेत?**

– आपल्या वर्गातील १००% विद्यार्थी मूलभूत वाचन क्षमता प्राप्त असावेत ही किमान अट आहे. त्यामुळे मूलभूत वाचन क्षमतेत जेवढे विद्यार्थी तेवढे कृती कार्यक्रम आराखडे असावेत.

**५) कृती कार्यक्रम आराखडा तयार केल्यावर पुढे काय करावे?**

– आराखडा तयार झाल्यावर तो आपल्या कायम दृष्टिक्षेपात राहील असा ठेवावा. प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात करावी. कृतीसाठी आवश्यक साहित्याची जुळवाजुळव अगोदरच करून ठेवलेली असावी. कृती घेण्याची मानसशास्त्रीय बैठक, मुलांची अध्ययनाची पद्धत इ. माहिती आपणास आहेच, याचा आधार घेत मुलाची कृती सुरू असताना त्याचे बारकाईने निरीक्षण करावे, कृतीची उद्दिष्ट साध्य होईपर्यंत आवश्यकतेनुसार नियोजनात बदल करावेत व दिलेल्या मुदतीच्या आत मूलभूत वाचन येईपर्यंत कार्य सुरू ठेवावे.

**६) कृती कार्यक्रमासाठी कोणता वेळ वापरावा?**

– आपल्या वर्गात काहीच मुले मूलभूत वाचन क्षमता अप्राप्त असणारी आहेत. मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रमातील एक–एक कृती ही फक्त ५ ते १५ मिनिटे चालू असणारी आहे. नियमित तासिका सुरू असताना ही मुले अगोदर काय करत असावी? तुम्ही त्यांच्यासाठी अगोदर कोणता वेळ देत होतात? हा विचार लक्षात घेऊन शाळेतील नियमित असणाऱ्या मराठी विषयाच्या तासिकेतच मागे असणाऱ्या मुलांसाठी कृती कार्यक्रम घ्यावा. यासाठी शालेय वेळेव्यतिरिक्त वेळ वापरणे अपेक्षित नाही.

**७) पर्यवेक्षण यंत्रणेने काय करावे?**

– पर्यवेक्षण यंत्रणेने वर्गभेटीच्या वेळी वर्गातील मूलभूत वाचन क्षमता अप्राप्त मुलांची संख्या विचारावी. तेवढ्या संख्येचे कृती आराखडे तयार झालेले पाहावेत. कृती कार्यक्रम आराखड्याप्रमाणे सुरू असणाऱ्या कृतींची माहिती घ्यावी. क्षमता अप्राप्त मुलांच्या गटात बसून सुरू असणाऱ्या कृतीच्या अगोदरच्या कृती साहित्याच्या सहाय्याने घ्याव्यात व कार्यक्रमाची परिणामकारकता तपासावी. आवश्यकतेनुसार मुलांच्या कृती स्वत: घेऊन शिक्षकांना मदत करावी. कार्यक्षेत्रातील १००% विद्यार्थ्यांचा मूलभूत वाचन क्षमता विकास करण्याची जबाबदारी आपल्यावर असल्याने योग्य नियोजन करावे.

# कृती कार्यक्रम नमुना आराखडा

विद्यार्थ्याचे नाव : ........................................................................................................ इयत्ता: ....................

वाचनाचासध्याचास्तर/टप्पा: ..........................................................................................................

मूलभूत वाचन क्षमता विकसित होण्यासाठीचा अंदाजे कालावधी : [ ] दिवस

वाचनामध्येअडथळेअसण्याचीकारणे: ..........................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

**विद्यार्थ्यांसाठी घ्यावयाच्या कृतींचे नियोजन :**

| अ.क्र. | कृतीचे उद्दिष्ट | कृती/कृतींची मालिका | साहित्य कार्ड क्र. | सुलभक (कोण असेल) | आवश्यक वेळ | कालावधी पासून – पर्यंत | निष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**महत्त्वाचे :** हा आराखडा नमुन्यादाखल असून यात बदल करण्याचे स्वातंत्र्य कृती कार्यक्रम आराखड्यात समावेश करावयाच्या बाबींचा विचार करून शिक्षकांनी घ्यावे.

इ. १ ली ते ५ वी तील १००% विद्यार्थ्यांचा मूलभूत वाचन क्षमता विकास : शिक्षक प्रशिक्षण

# ७. प्रशिक्षणाचे वेळापत्रक

**(बोली/बहुभाषिक क्षेत्रासाठी)**

| वेळ | दिवस १ | दिवस २ | दिवस ३ | दिवस ४ |
|---|---|---|---|---|
| १०.०० ते ११.१० | पूर्वचाचणी, प्रशिक्षणाची गरज, उद्दिष्टे व स्वरूप | श्रवण अनुभव : भाग १ (कृती क्र. १ ते ३) | भाषण संभाषण : भाग ३ (कृती क्र. ८ व ९) | वाचन : भाग ५ (कृती क्र. १७ ते १९) |
| ११.१० ते १२.२० | समता, प्रेरणा, मुलांचे शिक्षण व माझी भूमिका | श्रवण अनुभव : भाग २ (कृती क्र. ४, ५, ६ – संवाद ) | वाचन : भाग १ (कृती क्र. १ ते १०) | वाचन : भाग ६ (कृती क्र. २१ व २२) |
| १२.२० ते १२.३० | चहापान | | | |
| १२.३० ते १.४० | बहुभाषिक मुलांचे भाषा शिक्षण | श्रवण अनुभव : भाग ३ (कृती क्र. ७, ८ – नाटुकले) | वाचन : भाग २ (कृती क्र. ११ व १२) | कृतिकार्यक्रम : १ |
| १.४० ते २.३० | भोजन | | | |
| २.३० ते ३.४० | शिक्षण पूरक कृती १ (कृती क्र. १ ते ६) | भाषण संभाषण : भाग १ (कृती क्र. १ ते ४) | वाचन : भाग ३ (कृती क्र. १३ व १४) | कृतिकार्यक्रम : २ |
| ३.४० ते ३.५० | चहापान | | | |
| ३.५० ते ५.०० | शिक्षण पूरक कृती २ (कृती क्र. ७ ते ११) | भाषण संभाषण : भाग २ (कृती क्र. ५ ते ७) | वाचन : भाग ४ (कृती क्र. १५ व १६) | उत्तर चाचणी, Online Link भरणे |

- **मराठीपेक्षा वेगळी मातृभाषा बोलणाऱ्या मुलांचे प्रमाण लक्षणीय असणाऱ्या तालुक्यामध्ये हे प्रशिक्षण चार दिवसांचे असेल : बोलीभाषेच्या संदर्भात प्रत्येक सत्रात कोणत्या जादाच्या कृती घेणे व चर्चा करणे अपेक्षित आहे याचा तपशील पुढे सत्रनिहाय दिलेला आहे.**
- **प्रशिक्षण सत्रातील कृती करताना बहुभाषिक/मराठी भाषेतर विद्यार्थ्यांचे भाषा शिक्षण या लेखातील विचार व तत्त्वे यांचा वेळोवेळी आधार घ्यावा.**

| दिवस | बोलीभाषा बहुल क्षेत्रासाठीच्या वेळापत्रकातील तासिका क्रमांक | घटक संचातील कृती-क्रमांक | विषय/घटक | सत्रातील मूळ कृतींसोबत बोलीभाषेच्या संदर्भात घ्यावयाच्या कृती |
|---|---|---|---|---|
| पहिला | तासिका क्र. ५<br>शिक्षण पूरक कृती : भाग २ | कृती क्र. ६ | खेळ | • आपल्या परिसरात खेळले जाणारे खेळ घेतील. |
| दुसरा | तासिका क्र. १<br>श्रवण अनुभव : भाग १ | कृती क्र. २ | प्राणी, पक्षी व वाहनांचे आवाज | • परिसरातील प्राणी, पक्षी व वाहनांचे आवाज ऐकवतील. |
| | | कृती क्र. ३ | गाणी,<br>बडबडगीते,<br>कविता | • बोलीभाषेत उपलब्ध असलेली छोटी-छोटी गाणी, प्रमाण भाषेतून भाषांतरीत केलेली गाणी ऐकवतील.<br>• सण, उत्सव, लग्न, शेतीची कामे, जत्रा इ. प्रसंगी म्हटली जाणारी लोकगीते ऐकवतील. |
| | तासिका क्र. २<br>श्रवण अनुभव : भाग २ | कृती क्र. ४ | गोष्टी | • मराठीसोबतच बोलीभाषेतील चित्रमय गोष्टी दाखवतील व ऐकवतील. |
| | | कृती क्र. ५ | सहभागी वाचन | • बोलीभाषेतील एका गोष्टीचे आदर्श वाचन करतील.<br>• बोलीभाषेतील श्राव्य व दृक श्राव्य माध्यमाद्‌वारे गोष्ट ऐकवतील व दाखवतील.<br>• बोलीभाषेतील गोष्टीचे पुस्तक दिसेल असे धरतील. पुस्तकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, चित्रकार, लेखक, प्रकाशक, पुस्तकाचे नाव इ. सांगतील. पुस्तकाचे वाचन करून दाखवतील. |
| | | कृती क्र. ६ | संवाद | • प्रथम परिसरात घडणाऱ्या घटनांवर आधारित बोलीभाषेतील परिचित पात्रांमधील लहान लहान संवाद ऐकवतील.<br>• संवादाचे विषय देऊन बोलीभाषेत संवाद तयार करून घेतील व सादरीकरण घेतील. |
| | तासिका क्र. ३<br>श्रवण अनुभव : भाग ३ | कृती क्र. ६ | नाटुकले | • सूचना सुरुवातीस बोलीभाषेतून नंतर मिश्र व शेवटी मराठीतून ऐकवतील.<br>• नाटुकले या कृतीसाठी व संवाद या कृतीसाठी घेतलेल्या कृतीप्रमाणे कृती घेतील. |

| दिवस | बोलीभाषा बहुल क्षेत्रासाठीच्या वेळापत्रकातील तासिका क्रमांक | घटक संचातील कृती-क्रमांक | विषय/घटक | सत्रातील मूळ कृतींसोबत बोलीभाषेच्या संदर्भात घ्यावयाच्या कृती |
|---|---|---|---|---|
| | तासिका क्र. ३<br>श्रवण अनुभव : भाग ३ | कृती क्र. ७ व ८ | खेळ, कृतींची शब्दविरहित भाषा, सूचना | • खेळ यामध्ये गाणे वाढवत जातील या खेळात बोलीभाषेतील गाणे घ्यावे.<br>• (वर्गातील सूचना, खेळाच्या वेळी दिल्या जाणाऱ्या सूचना, परिपाठाच्या वेळी दिल्या जाणाऱ्या सूचना इ. सूचना देताना बोलीभाषेचा वापर करावा व गटकार्यात घेण्यात यावा.) |
| | तासिका क्र. ४<br>भाषण संभाषण : भाग १ | कृती क्र. १, २, कृती क्र. ३ | ओळख, माहिती, चित्रवर्णन, चित्रगप्पा, चित्रवाचन | • प्रथम बोलीभाषेतून नंतर तेच वाक्य मराठीतून वापरून ओळख करून देतील.<br>• मुलांना परिचित असलेल्या परिस्थितीतील चित्रांचे वर्णन प्रथम बोलीभाषेतून नंतर तेच बोली व मराठी वापरून मिश्र बोलतील व शेवटी मराठीतून सराव घेतील. |
| | | कृती क्र. ४ | गप्पा (अनौपचारिक व औपचारिक | • अनौपचारिक व औपचारिक गप्पा प्रथम बोलीभाषेतून व नंतर मराठीतून घेतील. |
| | तासिका क्र. ५<br>भाषण संभाषण : भाग २ | कृती क्र. ५ | संवाद, नाटुकले एकविणे/वाचून दाखविणे. | • श्रवणामध्ये झालेल्या बोलीभाषेतील छोटे प्रासंगिक, संवाद, प्रसंग नाट्य, नाटुकले तयार करतील व त्याचे सादरीकरण करतील. |
| | | कृती क्र. ६ व ७ | घटनाक्रम गोष्टी | • आपल्या परिचयातील घटनाक्रमाची चित्रे तयार करतील व घटनाक्रम लावतील.<br>• बोलीभाषेतील श्रवणातील कृतीमध्ये झालेल्या गोष्टी प्रथम सांगतील. नंतर अपरिचित अपूर्ण गोष्टी पूर्ण करतील. |
| तिसरा | तासिका क्र. १<br>भाषण संभाषण : भाग ३ | कृती क्र. ८ व ९ | गाणी, भाषिक खेळ व उपक्रम | • श्रवणात ऐकविण्यासाठी वापरलेल्या बोलीभाषेतील गाण्यांचा संग्रह व मुलांनी स्वतः म्हटलेल्या गाण्यांचा उपयोग करतील. भाषिक खेळात मुलांच्या बोलीभाषेचा स्वीकार करतील. |

| दिवस | बोलीभाषा बहुल क्षेत्रासाठीच्या वेळापत्रकातील तासिका क्रमांक | घटक संचातील कृती–क्रमांक | विषय/घटक | सत्रातील मूळ कृतींसोबत बोलीभाषेच्या संदर्भात घ्यावयाच्या कृती |
|---|---|---|---|---|
| | तासिका क्र. २<br>वाचन : भाग १ | कृती क्र. १ | चित्रवाचन | • आपल्या परिसरातील वस्तू, प्राणी, पक्षी, कृती, घटना, प्रसंग यांची चित्रे कृतींची चित्रे व A4 आकारातील मोठी चित्रे यांचे बोलीभाषेतून वाचन करतील. |
| | तासिका क्र. ३<br>वाचन : भाग २ | कृती क्र. १२ | चित्रशब्द कार्ड वाचन | • परिसरातील परिचित चित्रे घेऊन त्या चित्रांसाठीचे बोलीभाषेतील शब्द लिहून चित्र शब्द कार्डांचे वाचन करतील. |
| | तासिका क्र. ४<br>वाचन : भाग ३ | कृती क्र. १३<br>कृती क्र. १४ | शब्द चक्र व अक्षर गट<br>चित्रवाक्यसाचे | • आपल्या परिसरातील बोलीभाषेतून ज्या अक्षर गटांद्वारे जास्तीत जास्त शब्द बनविता येतील असे अक्षर गट तयार करतील, शब्दचक्रानंतर बोलीभाषेतून शब्द, वाक्य तयार करतील.<br>• अक्षर गटातील प्रत्येक अक्षराचे शब्दचक्र तयार करताना बोलीभाषेतील शब्द स्वीकारतील.<br>• चित्रवाक्ये साचे तयार करताना बोलीभाषेतील शब्द व परिचित चित्र वापरतील. |
| | तासिका क्र. ५<br>वाचन : भाग ४ | कृती क्र. १५ | अक्षरगटापासून वाचनपाठ तयार करणे. | • प्रथम बोलीभाषेतील लहान–लहान वाक्यांच्या आधारे वाचनपाठ तयार करून घ्यावेत. नंतर मराठीत वाचनपाठ तयार करून घ्यावेत. |
| चौथा | तासिका क्र. २<br>वाचन : भाग ६ | कृती क्र. २० | चित्रमय उतारे | • परिचित चित्र– परिचित शब्द (बोलीभाषेतील)<br>• अपरिचित चित्र – परिचित शब्द<br>• परिचित चित्र – अपरिचित शब्द<br>• अपरिचित चित्र – अपरिचित शब्द |

# मराठीपेक्षा वेगळी मातृभाषा असणाऱ्या मुलांच्या भाषा शिक्षणाची पूर्वतयारी

**खेळ :** आपल्या परिसरात खेळल्या जाणाऱ्या खेळांची मुलांकडून माहिती मिळविणे व त्याची यादी तयार करणे, या खेळांसाठी लागणारे साहित्य शाळेत उपलब्ध करणे.

**आवाज :** परिसरात प्राणी, पक्षी व वाहनांचे आवाज रेकॉर्ड करून किंवा नेटवरून मिळवून उपलब्ध ठेवणे.

**गाणी, बडबड गीते, कविता :** बोली भाषेत उपलब्ध असलेली छोटी–छोटी गाणी, प्रमाण भाषेतून भाषांतरित केलेली गाणी यांचा संग्रह करणे, सण, उत्सव, लग्न, शेतीची कामे, जत्रा इ. प्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या लोकगीतांचा संग्रह, प्रमाण भाषेतील गाण्यांसोबत त्याच प्रमाणात बोली भाषेतील गाणी ऐकविणे.

**गोष्टी :** बोली भाषेत चित्रमय गोष्टी तयार करणे, बोली भाषेत उपलब्ध असलेल्या, भाषांतरित केलेल्या गोष्टींचे Video तयार करणे.

**संवाद व नाटुकले, शब्दविरहीत भाषा :** परिसरात घडणाऱ्या घटनांवर आधारित परिचित पात्रांमधील लहान लहान संवाद व नाटुकले यांचा बोली भाषेत संग्रह करणे, सूचना पट्ट्या बोलीभाषेत तयार करणे.

**चित्रगप्पा :** मुलांना परिचित असलेल्या परिस्थितीतील चित्रांचा संग्रह करणे. यासाठी प्रत्यक्ष फोटो काढून हा संग्रह करणे.

**घटनाक्रम :** मुलांच्या परिचयातील घटना क्रमांची यादी तयार करणे हे घटनाक्रम चित्रस्वरूपात व लिखित स्वरूपात उपलब्ध करणे.

**गाणी, भाषिक खेळ, उपक्रम :** श्रवणात ऐकविण्यासाठी वापरलेल्या बोली भाषेतील गाण्यांचा संग्रह व मुलांनी स्वतः म्हटलेल्या गाण्यांचा उपयोग करणे. भाषिक खेळात मुक्तपणे मुलांना बोली भाषेचा वापर करून देणे.

**चित्रवाचन, चित्रवर्णन, चित्रगप्पा :** एक चित्र, कृतीचे चित्र व A4 आकारातील मोठे चित्र यांचा संग्रह करताना मुलांच्या अनुभव विश्वातील वस्तू, प्राणी, पक्षी, कृती, घटना प्रसंग यांचे फोटो घेऊन संग्रह करणे.

**चित्रशब्द कार्ड :** मुलांच्या परिचयाची चित्रे घेऊन मुलांच्या सहभागाने त्या चित्रांसाठीचे बोली भाषेतील शब्द लिहून चित्रशब्द कार्डांचे किमान २५ सेट बनविणे.

**अक्षरगट, शब्दचक्र, चित्रवाक्यसाचे :** आपल्या परिसरातील बोली भाषेतून ज्या अक्षरगटांद्वारे जास्तीत जास्त शब्द बनविता येतील असे अक्षरगट शिक्षकांनी तयार करणे शब्दचक्रानंतर त्यावरचे शब्द, वाक्य व वाचनपाठ तयार करणे, अक्षरगटातील प्रत्येक अक्षराचे शब्दचक्र तयार करताना बोली भाषेतील शब्द स्वीकारणे, चित्रवाक्यसाचे तयार करताना बोली भाषेतील शब्द व परिचित चित्र वापरणे.

**वाचन :** वाचनासाठी प्रमाणभाषेच्या संदर्भांसोबतच बोली भाषेतील द्विभाषिक पुस्तके उपलब्ध करणे, सुरुवातीलाच बोलीभाषा येत नसलेल्या शिक्षकांनी मुलांच्या मदतीने किमान २०० शब्दांचा शब्दकोश तयार करणे. मुलांनी शब्दकोशाचा वापर कसा करायचा हे समजून घेणे.

**कृती कार्यक्रम :** बोली भाषेच्या संदर्भांचा बारकाईने विचार करून कृती कार्यक्रम तयार करणे.

◈◈◈